




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २०९ ■ गुरूवार, दि. ५ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com









## चांदी गुंतवणूकदारांसाठी ‘ब्लॅक थर्सडे’

### ▶▶ सोने-चांदीच्या गुंतवणूकदारांना जबरदस्त फटका!
### ▶▶ रेकॉर्डब्रेक दर गाठल्यानंतर फुगवटा फुटला!

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**दिल्ली :** सोने आणि चांदीच्या बाजारात गुरुवारचा दिवस अतिशय वाईट ठरला आहे. गुरुवारी मौल्यवान धातूंच्या बाजारात अचानक जोरदार धक्का बसला असून सकाळी बाजारात ट्रेडिंग सुरु झाल्यापासून एमसीएक्सवर सिल्वर आणि सोन्याच्या किमतीत मोठी घसरण झाल्यानंतर चांदीच्या ईटीएफमध्ये १६टक्केपर्यंत लक्षणीय घट झाली तर, सोन्याचे ईटीएफ देखील ५टक्के घसरले. भारतीय कमोडिटी बाजारातील गुंतवणूकदारांसाठी गुरुवारचा दिवस आवाहनात्मक ठरला असून सोने आणि चांदीच्या किमतीतील घसरणीने बाजारातील तज्ज्ञांनाही आश्चर्यचकित केले. गेल्या दोन सत्रांमधील करेक्शननंतर गुंतवणूकदारांनी पुन्हा एकदा नफा बुकिंग सुरु केली, ज्यामुळे बाजारातील भावना पुन्हा एकदा कमकुवत झाली. त्याचवेळी, आता सर्वांचे लक्ष अमेरिकेतील नोकऱ्यांच्या आकडेवारीवर आणि फेड रिझर्व्हच्या व्याज दरांवर लागून असेल.

सोने आणि चांदीच्या किमतीत मागील दोन सत्रांत सुधारणा झालेली, पण आज, गुरुवारी, पुन्हा दबाव वाढला. एमसीएक्सवर चांदीचे मार्च फ्युचर्स ६टक्के घसरून किलोमागे २,५२,७१९ रुपयांवर घसरले. याशिवाय एप्रिल सोन्याचा वायदा दर ३ टक्के घसरून प्रति १० ग्रॅम १,४८,४५५ रुपये झाला. अलिकडच्या तेजीनंतरच्या नफा बुकिंगमुळे ही घसरण होत असल्याचे दिसून येत आहे. या घसरणीमुळे टाटा, एचडीएफसी आणि आयसीआयसीआय यासारख्या प्रमुख सिल्व्हर ईटीएफमध्ये १२ ते १४ टक्के मोठी घसरण झाली. सतत दोन दिवसांच्या तेजीनंतर सोने-चांदीच्या बाजारात नफावसुली होताना जागतिक बाजारातील गुंतवणूकदारांचे लक्ष आता अमेरिकेच्या एडीपी नॉन-फार्म पेरोल डेटा आणि सेवा पीएमआयवर लक्ष ठेवून असतील. मात्र, मुख्यतः शुक्रवारीच्या यूएस जॉब रिपोर्ट जारी होईल, जो फेड रिझर्व्हच्या व्याजदर कपातीचे संकेत देईल.

### गोल्ड ईटीएफमध्येही घसरण

याशिवाय एडेलवाईस गोल्ड ईटीएफ, चॉईस गोल्ड ईटीएफ, ॲक्सिस एमएफ गोल्ड ईटीएफ, डीएसपी गोल्ड ईटीएफ, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल गोल्ड ईटीएफ, ३६० वन गोल्ड ईटीएफ, एसबीआय गोल्ड ईटीएफ यासाख्या बड्या कंपन्यांचे ईटीएफ सुमारे ५ टक्क्यांनी खाली आले आहेत.


### खरी चांदी कशी ओळखावी?

विज्ञानानुसार, चांदी हा 'पॅरामॅग्नेटिक' धातू आहे, म्हणजे तो चुंबकाला अजिबात चिकटत नाही. जर तुमचं चांदीचं नाणं किंवा दागिना चुंबकाला थोडा जरी ओढला गेला, तर त्यात निकेल किंवा कोबाल्टची भेसळ आहे असं समजा. अगदी हलकी हालचालही बनावटपणाचा पुरावा असू शकते. दुसरी आणि सर्वात खात्रीशीर पद्धत म्हणजे 'आईस टेस्ट'. चांदी हा उष्णतेचा सर्वोत्तम वाहक आहे. चांदीच्या नाण्यावर किंवा दागिन्यावर बर्फाचा तुकडा ठेवा. जर बर्फ सामान्य वेगापेक्षा खूप वेगाने वितळू लागला, तर ती शुद्ध चांदी आहे. तुम्हाला असं वाटेल की बर्फाखाली गरम कोळसा ठेवलाय!चांदीला एक विशिष्ट 'मेटॅलिक' आवाज असतो. जर ती आदळल्यावर खणखणीत आवाजाऐवजी दबलेला आवाज आला, तर सावध व्हा. या घरगुती चाचण्या प्राथमिक खात्रीसाठी उत्तम आहेत, पण मोठ्या खरेदीवेळी नेहमी हॉलमार्क आधारावरच विकत घ्या. चांदीला पांढऱ्या सुती कापडाने घासून पहा. जर कापडावर काळा डाग पडला, तर समजा तुमची चांदी खरी आहे. कारण हवेतील ऑक्सिजनशी संपर्क आल्यावर खऱ्या चांदीवर काळा थर जमा होतो. महिलांनो, दागिने घेताना नेहमी जागरूक राहा आणि हॉलमार्क, बी आय एस नक्की तपासा.



### चांदी तब्बल २७ हजार ८८४ रूपयांनी स्वस्त

आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडींमुळे आज सोन्या-चांदीच्या किमतीत मोठी घसरण झाली. चांदी तब्बल २७ हजार ८८४ रुपयांनी स्वस्त होऊन २ लाख ४६ हजार ६६५ रुपये प्रति किलोवर आलीये. सोन्याच्या दरातही घट झाली आहे. मुंबईत २४ कॅरेट सोन्याचा भाव १ लाख ५४ हजार ४२० रुपये प्रति १० ग्रॅम नोंदवला गेलाय... सोनं आणि चांदीच्या या घसरणीमुळे गुंतवणूकदार आणि ग्राहकांना मोठा दिलासा मिळालाय. आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक घडामोडींमुळे मौल्यवान धातूंच्या किमतीत ही घसरण झाल्याचे सांगण्यात येत आहे.



## 32 तासानंतर मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे पुन्हा ‘जॅम’!

### कंटेनर बंद पडल्याने पुन्हा वाहनांच्या रांगा

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**मुंबई :** मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर प्रवाशांना पुन्हा एकदा वाहतूक कोंडीचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. गेल्या ३२ तासांपासून सुरू असलेला वाहतूक कोंडीचा त्रास अद्याप संपलेला नाही. आडोशी बोगद्याजवळील गॅस टँकरचा अपघात आणि आता लोणावळ्याजवळ बंद पडलेला सिमेंट कंटेनर, यामुळे हा मार्ग पुन्हा ठप्प झाला आहे. लोणावळ्या अलीकडे २० किमीपासून वाहनांच्या संथ रांगा पाहायला मिळत आहेत.

आडोशी बोगद्याजवळ गॅस टँकर उलटल्याने सुरक्षा कारणास्तव वाहतूक बराच वेळ थांबवण्यात आली होती. तब्बल ३२ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर हा टँकर बाजूला करण्यात प्रशासनाला यश आले. मात्र, ही कोंडी फुटेत न फुटते तोच तळेगाव ते मळवली दरम्यान मुंबईच्या दिशेने जाणारा एक सिमेंट कंटेनर मधोमध बंद पडला. यामुळे मुंबईकडे येणारी वाहतूक पुन्हा एकदा पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. प्रशासनाकडून बंद पडलेला सिमेंट कंटेनर बाजूला काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. कोंडी कमी करण्यासाठी काही हलकी वाहने जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरून वळवण्यात येत आहेत. मात्र जोपर्यंत सिमेंट कंटेनर पूर्णपणे हटवला जात नाही, तोपर्यंत वाहतूक मंदावलेलीच राहील, असे दिसून येत आहे.

दरम्यान, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर मंगळवारी आडोशी बोगद्याजवळ गॅस वाहतूक करणारा टँकर पलटी होवून त्यामधील ज्वलनशील प्रोपेलीन वायूची गळती सुरू झाली होती. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने द्रुतगती महामार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली होती. त्यानंतर महामार्ग पोलीस, रायगड जिल्हा पोलीस दल तसेच फायरब्रिगेड, एनडीआरएफ, बीपीसीएल, हेल्प फाउंडेशन व काही केमिकल एक्सपर्ट हे घटना घडल्यापासून वायू गळती रोखून वाहतूक सुरळित करण्यासाठी प्रयत्न करत होते.

गॅस टँकरमधील वायू गळती रोखणे हे तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक होते तरीदेखील सर्व यंत्रणांनी केमिकल एक्सपर्ट यांच्या मदतीने अथक प्रयत्न करून टँकरमधील वायू गळती थांबवून तो सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आला.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी सुनेत्रा पवारांची बिनविरोध निवड होणार!

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष निवड पुढल्या एक महिन्याच्या आधी करण्याच्या हालचाली सुरु असल्याची सूत्रांची माहिती आहे. अर्थसंकल्प अधिवेशन कालावधीतच राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष निवडणूक पार्टी अंतर्गत करण्याच्या हालचाली सुरु आहेत. पार्टीचे पत्र राज्यातील पदाधिकारी तसंच राष्ट्रीय कार्यकारिणी पदाधिकारी यांच्या सहमतीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांची निवड बिनविरोध होणार असल्याची माहिती देखील सूत्रांनी दिली आहे.



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर ३१ जानेवारीला सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सूत्रांनी केलेल्या दाव्याप्रमाणे सुनेत्रा पवार यांनी शपथ घेण्यापूर्वी पवार कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांना निरोप दिला होता. अपघातानंतर नरेंद्र मोदींचा सांत्वनपर फोन सुनेत्रा पवारांना आला होता. दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणाविषयी प्रस्ताव शरद पवारांच्या गटाकडून अजित पवारांकडे येत होते. शरद पवारांच्या पक्षाकडून येणारे प्रस्ताव अजित पवारांनी पक्षात वरिष्ठ वर्तुळात सांगितले.

## नवी मुंबई महापालिकेवर भाजपचा झेंडा!

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या राजकारणात आज भाजपची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडणुकीत भाजपने बाजी मारली असून, सुजाता पाटील यांची महापौरपदी आणि दशरथ भगत यांची उपमहापौर पदी बिनविरोध निवड झाली आहे.

महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपमध्ये सुरुवातीला रंगलेली चुरस अखेर माघारीने संपली आणि भाजपचा मार्ग मोकळा झाला. या निवडणुकीत शिवसेना आणि भाजप यांच्यात थेट लढत होण्याची चिन्हे होती. शिवसेनेच्या वतीने महापौर आणि उपमहापौर अशा दोन्ही पदांसाठी नामांकन अर्ज दाखल करण्यात आले होते.



नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीतील चुरस या निवडीतही पाहायला मिळेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र, प्रत्यक्ष निवडणुकीच्या दिवशी नाट्यमय घडामोडी घडल्या.

शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराने आपला अर्ज मागे घेतल्याने भाजपच्या सुजाता पाटील यांची निवड बिनविरोध झाली. तर उपमहापौर पदासाठी शिंदे गटाने माघार घेतल्याने भाजपचे दशरथ भगत यांची बिनविरोध निवड झाली. १११ सदस्यांच्या नवी मुंबई महानगरपालिकेत भाजपकडे ६५ नगरसेवकांसह स्पष्ट बहुमत आहे. एका अपक्ष उमेदवाराच्या पाठिंब्यामुळे हे संख्याबळ ६६ वर पोहोचले होते. भाजपचे ज्येष्ठ नेते गणेश नाईक यांच्या रणनीतीमुळे ही निवडणूक बिनविरोध करण्यात भाजपला यश आले. या विजयामुळे नवी मुंबईतील महापालिकेची सत्ता पूर्णपणे भाजपच्या ताब्यात आली असून नाईक कुटुंबाचा बालेकिल्ला पुन्हा एकदा अभेद्य राहिल्याचे दिसून येत आहे.

## ‘लाडकी बहीण’साठी ७१० पुरूषांनी भरले अर्ज!

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**नंदुरबार :** राज्य सरकारची अत्यंत लोकप्रिय आणि महत्त्वाकांक्षी असलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना नंदुरबार जिल्ह्यात एका धक्कादायक प्रकारामुळे चर्चेत आली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना सक्षम करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या या योजनेचा लाभ काही पुरुषांनी लाटल्याचे उघड झाले आहे. नंदूरबार जिल्ह्यातील तब्बल ७१० पुरुषांनी या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर केले होते. मात्र जिल्हा प्रशासनाच्या सतर्कतेमुळे हा अजब आणि गंभीर गैरप्रकार वेळेत उघडकीस आला आहे. नंदुरबार जिल्हा महिला व बालकल्याण विभागामार्फत सध्या प्राप्त अर्जांची युद्धपातळीवर छाननी प्रक्रिया सुरू आहे.

## मुंबईच्या महापौर, उपमहापौरपदासाठी ठाकरे गटाकडूनही उमेदवार देण्याच्या हालचाली!

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**मुंबई :** मुंबई महापालिका महापौरपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम अखेर ठरला आहे. ७ फेब्रुवारी रोजी महापौरपदासाठी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. तर ११ फेब्रुवारीला मुंबई महापालिकेच्या महापौरपदाची घोषणा करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. ११ फेब्रुवारी रोजीच दुपारी १२ वाजता विशेष सभेचे आयोजन करण्यात आले असून महापौरपादासाठी अर्ज मागे घेण्याची वेळ सभागृह भरण्याच्या १५ मिनिटं आधी असणार आहे. याचदरम्यान एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. शिवसेना ठाकरे गट सुद्धा महापौर, उपमहापौर पदासाठी उमेदवार देणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेचे संख्याबळ जास्त असतानासुद्धा शिवसेना ठाकरे गट सुद्धा महापौर, उपमहापौर पदाचा उमेदवार देण्याची शक्यता आहे. ७ फेब्रुवारीला शिवसेना ठाकरे गट महापौर, उपमहापौर पदाचा उमेदवाराचा अर्ज भरणार का? याकडे लक्ष असणार आहे, या सगळ्या संदर्भात गटनेता किशोरी पेडणेकर व इतर काही अनुभवी नगरसेवकांना बैठकीसाठी मातोश्रीवर बोलवलं असल्याची माहिती समोर आली आहे. संख्याबळ नसलं तरी महापौर उपमहापौर पदाचा अर्ज भरण्याचा ठाकरेच्या शिवसेनेचा विचार सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ थाटात

### सर्वाधिक सुवर्णांचा मानकरी ठरला सुदर्शन उंबरकर

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ गुरुवार, ५ फेब्रुवारीला थाटात पार पडला. विद्यापीठ परिसरातील दीक्षांत सभागृहात पार पडलेल्या या शानदार सोहळ्यात गडचिरोली कृषी महाविद्यालयाचा बीएसस्सीचा विद्यार्थी सुदर्शन उंबरकर याने ४ सुवर्ण आणि २ रौप्य पदक पटकावित सर्वाधिक सुवर्ण पदक पटाकाविण्याचा मान मिळविला. त्यानंतर सुवर्णा जामनिक हिने ३ सुवर्ण, ४ रोख आणि १ रौप्य पदक मिळविले तर एम.एसस्सीच्या प्रज्ञा चतुर्वेदी हिने ३ सुवर्ण आणि २ रौप्य



पदाकाची कमाई केली. तसेच या समारंभात विविध विषयांत २ हजार ९३६ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे विद्यापीठांमध्ये उत्कृष्ट संशोधक, आचार्य तसेच उत्कृष्ट कर्मचारी यांचा देखील यावेळी सन्मान करण्यात आला. डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा ४० व दीक्षांत समारंभ गुरूवारी उत्साहात पार पडला. या दीक्षांत समारंभात गुजरात येथील आनंद कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. बी. कथीरीया, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, राहुरी विद्यापीठाचे कुलगुरू विलास खर्चे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमात २ हजार ९३६ स्नातकांना निरनिराळ्या पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये ४१ आचार्य पदवी, ३१४ स्नातकोत्तर, १ हजार ७७० पदवीधारकांनी आपली पदवी स्वीकारली. या दीक्षांत समारंभात ३२ विद्यार्थ्यांना सुवर्णपदके, १६ विद्यार्थ्यांना रौप्य पदके तर ३४ विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक प्रदान करण्यात आली तर तीन विद्यार्थ्यांना पुस्तक स्वरूपात पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. याबरोबर संशोधक आचार्य उत्कृष्ट कर्मचारी उत्कृष्ट शिक्षक या व इतर शाखांमधील ८५ पारितोषिक वितरित करण्यात आले. या दीक्षांत समारंभात विद्यार्थी, पालक तसेच डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील शिक्षक, प्राचार्य व शास्त्रज्ञ मोठ्या संख्येत उपस्थित होते.

### दीक्षांत समारंभाकडे राज्यपालांसह अनेकांनी फिरवली पाठ!

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांचा विद्यार्थ्यांचा सोहळा असलेल्या दीक्षांत समारंभाला राज्यपाल येणार होते. मात्र ते येऊ शकले नाहीत. तसेच समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून कृषी मंत्री तथा दत्तात्रय भरणे, कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल उपस्थित राहणार होते. मात्र ते दिसून आले नाहीत. त्यामुळे त्यांनी या सोहळ्याकडे पाठ फिरविल्याचे दिसून आले.

### सुवर्ण पदकांचे पहिले तीन मानकरी

गडचिरोली कृषी महाविद्यालयाचा बी.एसस्सीचा विद्यार्थी सुदर्शन उंबरकर याने ४ सुवर्ण, २ रोख पुरस्कार, सुवर्णा जामनिक ३ सुवर्ण, ४ रोख आणि १ रौप्य पदक तर प्रज्ञा चतुर्वेदी हिने ३ सुवर्ण, २ रोख पारितोषिक पटकाविले आहेत. या व्यतिरिक्त अनेक विद्यार्थ्यांवर सुवर्ण, रौप्य आणि रोख पुरस्कारांची लयलूट करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व पालकांनी एकच जल्लोष केला.

### अशा मिळाल्यात पदव्या!

या दीक्षांत समारंभात एकूण २ हजार ९३६ विद्यार्थ्यांना निरनिराळ्या विषयांत पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये बीएस्सी कृषी १ हजार ९८६, उद्यानविद्या १९८, वनविद्या ४५, कृषी जैवतंत्रज्ञान ८६, कृषी व्यवसाय व्यवस्थापन ६६, अन्न तंत्रज्ञान ५३, कृषी अभियांत्रिकी ७१, पदव्युत्तर अभ्यासक्रम विद्या शाखेमधील एकूण ३८३ विद्यार्थ्यांपैकी एमएस्सी कृषी २६७, उद्यानविद्या ३६, वनविद्या ९, कृषी अभियांत्रिकी १४ व कृषी व्यवसाय व्यवस्थापन शाखा ५७ यासह ४८ पदविकांक्षींना आचार्य पदवी प्रदान करण्यात आली.

CMYK CMYK

रजिस्ट्री सं. डी.एल.-33004/99 REGD. No. D. L.-33004/99

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-27012026-269560
CG-DL-E-27012026-269560

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II-खण्ड 3-उप-खण्ड (ii)
PART II Section 3-Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 301] नई दिल्ली, बुधवार, जनवरी 21, 2026/माघ 1, 1947
No. 301] NEW DELHI, WEDNESDAY, JANUARY 21, 2026/MAGHA 1, 1947

## सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय
## अधिसूचना
नई दिल्ली, २१ जनवरी, २०२६

**का.आ. ३२९(अ).** - केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम १९५६ (१९५६ का ४८) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३क की उप-धारा (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि **महाराष्ट्र राज्य के अकोला जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१ए के कि.मी. ०/०० से कि.मी. ३/१०० (महान-अकोला भाग) तक के भूखंड का निर्माण (बार्शीटाकळी बायपास चार लेन पेव्ह शोल्डर सहित का बनाने, आदि),** अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा ३ग की उपधारा (१) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी, तथा **उपविभागीय अधिकारी मुर्तीजापुर** को लिखित रूप में किया जायगा और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप में था किसी विधि व्यवसायी द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आक्षेपो की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा ३ग की उप-धारा (२) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

### अनुसूची

**महाराष्ट्र राज्य के अकोला जिले मे राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१ ए के कि.मी. ०/०० से कि.मी. ३/१०० (महान-अकोला भाग) लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण.**

| राज्य का नाम: महाराष्ट्र | | | जिले का नाम: अकोला | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| तालुक का नाम : बार्शिटाकळी | | | | | |
| गांव का नाम : बार्शिटाकळी | | | | | |
| 1 | 101/2A | निजी | अकृषक | 0.09 (हेक्टेयर) | 0.09 |
| 2 | 102/2B | निजी | अकृषक | 0.16 (हेक्टेयर) | 0.16 |
| 3 | 102/3 | सरकारी | कृषक | 0.12 (हेक्टेयर) | 0.12 |
| 4 | 103/2 | निजी | कृषक | 0.02 (हेक्टेयर) | 0.02 |
| 5 | 104 | निजी | कृषक | 0.0231 (हेक्टेयर) | 0.0231 |
| 6 | 109/1 | निजी | कृषक | 0.4 (हेक्टेयर) | 0.4 |
| 7 | 109/1A | निजी | कृषक | 0.4 (हेक्टेयर) | 0.4 |
| 8 | 109/2 | निजी | कृषक | 0.14 (हेक्टेयर) | 0.14 |
| 9 | 294/1 | निजी | कृषक | 0.42 (हेक्टेयर) | 0.42 |
| 10 | 295/1 Pai | निजी | अकृषक | 0.0197 (हेक्टेयर) | 0.0197 |
| 11 | 295/1/1A | निजी | अकृषक | 0.016015 (हेक्टेयर) | 0.016015 |
| 12 | 295/1/1/4A | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर | 0.014777 |
| 13 | 295/1/10A | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर | 0.014777 |
| 14 | 295/1/10 B | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर | 0.014777 |
| 15 | 295/1/2A | निजी | अकृषक | 0.012732 (हेक्टेयर) | 0.012732 |
| 16 | 295/1/27 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 17 | 295/1/28 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 18 | 295/1/29 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 19 | 295/1/30 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 20 | 295/1/31 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 21 | 295/1/32 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर | 0.005375 |
| 22 | 295/1/33 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 23 | 295/1/34 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 24 | 295/1/35 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 25 | 295/1/36 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 26 | 295/1/37 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 27 | 295/1/38 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 28 | 295/1/39 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 29 | 295/1/3A | निजी | अकृषक | 0.013792 (हेक्टेयर) | 0.013792 |
| 30 | 295/1/4 | निजी | अकृषक | 0.005566 (हेक्टेयर) | 0.005566 |
| 31 | 295/1/40 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 32 | 295/1/41 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 33 | 295/1/42 | निजी | अकृषक | 0.005375 (हेक्टेयर) | 0.005375 |
| 34 | 295/1/43 | निजी | अकृषक | 0.0051 (हेक्टेयर) | 0.0051 |
| 35 | 295/1/44 | निजी | अकृषक | 0.005 (हेक्टेयर) | 0.005 |
| 36 | 295/1/45 | निजी | अकृषक | 0.005 (हेक्टेयर) | 0.005 |
| 37 | 295/1/46 | निजी | अकृषक | 0.005 (हेक्टेयर) | 0.005 |
| 38 | 295/1/47 | निजी | अकृषक | 0.005566 (हेक्टेयर) | 0.005566 |
| 39 | 295/1/4B | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर) | 0.014777 |
| 40 | 295/1/5 | निजी | अकृषक | 0.005566 (हेक्टेयर) | 0.005566 |
| 41 | 295/1/5A | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर) | 0.014777 |
| 42 | 295/1/5B | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर) | 0.014777 |
| 43 | 295/1/6A | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर) | 0.014777 |
| 44 | 295/1/6B | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर) | 0.014777 |
| 45 | 295/1/7A | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर) | 0.014777 |
| 46 | 295/1/7B | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर) | 0.014777 |
| 47 | 295/1/8A | निजी | अकृषक | 0.009851 (हेक्टेयर) | 0.009851 |
| 48 | 295/1/9A | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर) | 0.014777 |
| 49 | 295/1/9B | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर) | 0.014777 |
| 50 | 295/5 | निजी | कृषक | 0.24 (हेक्टेयर) | 0.24 |
| 51 | 302/1 | निजी | कृषक | 0.42 (हेक्टेयर) | 0.42 |
| 52 | 318 | सरकारी | कृषक | 0.1867 (हेक्टेयर) | 0.1867 |
| 53 | 319 | सरकारी | कृषक | 0.4334 (हेक्टेयर) | 0.4334 |
| 54 | 40/1 | निजी | कृषक | 1.08 (हेक्टेयर) | 1.08 |
| 55 | 40/1 | निजी | अकृषक | 0.07 (हेक्टेयर) | 0.07 |
| 56 | 40/1A | निजी | कृषक | 0.09 (हेक्टेयर) | 0.09 |
| 57 | 40/2 | निजी | कृषक | 0.12 (हेक्टेयर) | 0.12 |
| 58 | 40/3 | निजी | कृषक | 0.03 (हेक्टेयर) | 0.03 |
| 59 | 40/4 | निजी | कृषक | 0.14 (हेक्टेयर) | 0.14 |
| 60 | 41 | निजी | कृषक | 0.04 (हेक्टेयर) | 0.04 |
| 61 | 42/2 | सरकारी | कृषक | 0.01 (हेक्टेयर) | 0.01 |
| 62 | 45/1/D | निजी | कृषक | 0.07 (हेक्टेयर) | 0.07 |
| 63 | 45/1/E | निजी | कृषक | 0.04 (हेक्टेयर) | 0.04 |
| 64 | 45/1/K | निजी | अकृषक | 0.04 (हेक्टेयर) | 0.04 |
| 65 | 45/3 | निजी | अकृषक | 0.04 (हेक्टेयर) | 0.04 |
| 66 | 45/3 | निजी | अकृषक | 0.07 (हेक्टेयर) | 0.07 |
| 67 | 76 | सरकारी | कृषक | 0.011648 (हेक्टेयर) | 0.011648 |
| 68 | 78/2 | निजी | अकृषक | 0.002 (हेक्टेयर) | 0.002 |
| 69 | 18 | निजी | अकृषक | 0.05 (हेक्टेयर) | 0.05 |
| 70 | 9/1/A | निजी | अकृषक | 0.02 (हेक्टेयर) | 0.02 |
| | | | | **Total** | **5.34906** |

## MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS
## NOTIFICATION
### New Delhi, the 21st January, 2026

**S.O. 329(E):** In exercise of powers conferred by sub- section (1) of section 3A of the National highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpoes, the land, the brief scription of which is given in the Schedule below, is required for **Building (Barshitakli Bypas Four Lane with paved shoulder) maintenance, management and operation of National Highway No. 161A at Barshitakli in the stretch of land fromed Km 0/00 to Km 3/100 (Mahan-Akola Section) in the district of Akola in the state of Maharashtra,** hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within tewnty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, raise objections to the ues of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, **Sub Divisional Officer Murtizapur,** in writing and shall set out the grounds there of and the Competent Authority shall give the objector and opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and mayed, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks neccesary, by order, either Allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub- section (2) of esction 3C of the said Act shall be final.

The land plans and other datails of the land to be covered under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

### SCHEDULE

**Brief description of the land to be acquired, with or without structure falling NH161A within the stretch of the land from Km0/00 to Km 3/100 (Mahan-Akola Section) in the district of Akola in the state of Maharashtra.**

पुढील पानावर...

मागील पानावर...

**State: MAHARASHTRA** **District: AKOLA**

| Sl. No. | Survey/Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectares) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |

**Taluka: Barshitakli**

**Village: Barshitakli**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 101/2A | Private | Non-Agriculture | 0.09 (Hectare) | 0.09 |
| 2 | 102/2B | Private | Non-Agriculture | 0.16 (Hectare) | 0.16 |
| 3 | 102/3 | Government | Agriculture | 0.12 (Hectare) | 0.12 |
| 4 | 103/2 | Private | Agriculture | 0.02 (Hectare) | 0.02 |
| 5 | 104 | Private | Non-Agriculture | 0.0231 (Hectare) | 0.0231 |
| 6 | 109/1 | Private | Agriculture | 0.4 (Hectare) | 0.4 |
| 7 | 109/1A | Private | Agriculture | 0.4 (Hectare) | 0.4 |
| 8 | 109/2 | Private | Agriculture | 0.14 (Hectare) | 0.14 |
| 9 | 294/1 | Private | Agriculture | 0.42 (Hectare) | 0.42 |
| 10 | 295/1 Pai | Private | Non-Agriculture | 0.0197 (Hectare) | 0.0197 |
| 11 | 295/1/1A | Private | Non-Agriculture | 0.016015 (Hectare) | 0.016015 |
| 12 | 295/1/1/4A | Private | Non-Agriculture | 0.014777 (Hectare) | 0.014777 |
| 13 | 295/1/10A | Private | Non-Agriculture | 0.014777 (Hectare) | 0.014777 |
| 14 | 295/1/10B | Private | Non-Agriculture | 0.012732 (Hectare) | 0.012732 |
| 15 | 295/1/2A | Private | Non-Agriculture | 0.0012732 (Hectare) | 0.012732 |
| 16 | 295/1/27 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 17 | 295/1/28 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 18 | 295/1/29 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 19 | 295/1/30 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 20 | 295/1/31 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 21 | 295/1/32 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 22 | 295/1/33 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 23 | 295/1/34 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 24 | 295/1/35 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare | 0.005375 |
| 25 | 295/1/36 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 26 | 295/1/37 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 27 | 295/1/38 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0,005375 |
| 28 | 295/1/39 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0,005375 |
| 29 | 295/1/3A | Private | Non-Agriculture | 0.013792 (Hectare) | 0.013792 |
| 30 | 295/1/4 | Private | Non-Agriculture | 0.005566 (Hectare) | 0.005566 |
| 31 | 295/1/40 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 32 | 295/1/41 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 33 | 295/1/42 | Private | Non-Agriculture | 0.005375 (Hectare) | 0.005375 |
| 34 | 295/1/43 | Private | Non-Agriculture | 0.0051 (Hectare) | 0.0051 |
| 35 | 295/1/44 | Private | Non-Agriculture | 0.005 (Hectare) | 0,005 |
| 36 | 295/1/45 | Private | Non-Agriculture | 0.005 (Hectare) | 0.005 |
| 37 | 295/1/46 | Private | Non-Agriculture | 0.005 (Hectare) | 0.005 |
| 38 | 295/1/47 | Private | Non-Agriculture | 0.005566 (Hectare) | 0.005566 |
| 39 | 295/1/4B | Private | Non-Agriculture | 0.014777 (Hectare ) | 0.014777 |
| 40 | 295/1/5 | Private | Non-Agriculture | 0.005566 (Hectare) | 0.005566 |
| 41 | 295/1/5A | Private | Non-Agriculture | 0.014777 (Hectare) | 0.014777 |
| 42 | 295/1/5B | Private | Non-Agriculture | 0.014777 (Hectare) | 0.014777 |
| 43 | 295/1/6A | Private | Non-Agriculture | 0.014777 (Hectare) | 0.014777 |
| 44 | 295/1/6B | Private | Non-Agriculture | 0.014777 (Hectare) | 0.014777 |
| 45 | 295/1/7A | Private | Non-Agriculture | 0.014777 (Hectare) | 0.014777 |
| 46 | 295/1/7B | Private | Non-Agriculture | 0.014777 (Hectare) | 0.014777 |
| 47 | 295/1/8A | Private | Non-Agriculture | 0.009851 (Hectare) | 0.009851 |
| 48 | 295/1/9A | Private | Non-Agriculture | 0.014777 (Hectare) | 0.014777 |
| 49 | 1295/1/9B | Private | Non-Agriculture | 0.014777 (Hectare) | 0.014777 |
| 50 | 295/5 | Private | Agriculture | 0.24 (Hectare) | 0.24 |
| 51 | 302/1 | Private | Agriculture | 0.42 (Hectare) | 0.42 |
| 52 | 318 | Government | Agriculture | 0.1867 (Hectare) | 0.1867 |
| 53 | 319 | Government | Agriculture | 0.4334 (Hectare) | 0.4334 |
| 54 | 40/1 | Private | Agriculture | 1.08 (Hectare) | 1.08 |
| 55 | 40/1 | Private | Non-Agriculture | 0.07 (Hectare) | 0.07 |
| 56 | 40/1A | Private | Agriculture | 0.09 (Hectare) | 0.09 |
| 57 | 40/2 | Private | Agriculture | 0.12 (Hectare) | 0.12 |
| 58 | 40/3 | Private | Agriculture | 0.03 (Hectare) | 0.03 |
| 59 | 40/4 | Private | Agriculture | 0.14 (Hectare) | 0.14 |
| 60 | 41 | Private | Agriculture | 0.04 (Hectare) | 0.04 |
| 61 | 42/2 | Government | Agriculture | 0.01 (Hectare) | 0.01 |
| 62 | 45/1/D | Private | Agriculture | 0.07 (Hectare) | 0.07 |
| 63 | 45/1/E | Private | Agriculture | 0.04 (Hectare) | 0.04 |
| 64 | 45/1/K | Private | Non-Agriculture | 0.04 (Hectare) | 0.04 |
| 65 | 45/3 | Private | Non-Agriculture | 0.04 (Hectare) | 0.04 |
| 66 | 45/3 | Private | Non-Agriculture | 0.07 (Hectare) | 0.07 |
| 67 | 76 | Government | Agriculture | 0.011648 (Hectare) | 0.011648 |
| 68 | 78/2 | Private | Non-Agriculture | 0.002 (Hectare) | 0.002 |
| 69 | 8 | Private | Non-Agriculture | 0.05 (Hectare) | 0.05 |
| 70 | 9/1/A | Private | Non-Agriculture | 0.02 (Hectare) | 0.02 |
| | | | | **Total** | **5.34906** |

**[F. No. RO/MUM/NH(O)/2023-24/72/3a/3A]**
**SAIKH AMINKHAN, Director**

जा.क्र./जिमाका/अकोला/जाहिरात/150/2026

# ग्राम पंचायत निधीतून विविध विकास कामाचे भूमीपूजन

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी



**आलेगाव:** येथील मुस्लिम स्मशान भूमीमध्ये पेवर ब्लॉक, तर नरहरी पाटील यांच्या घरासमोरील कॉंक्रिट रस्त्यासह विविध काम करण्या हेतूने आलेगाव ग्राम पंचायत प्रशासनाने ३ रोजी विविध कामाचे भूमीपूजन करण्यात आले.

मुस्लिम समाज स्मशान भूमी पेव्हर ब्लॉक कामा करीता हाफीज जुबैर, सरपंच गोपाल महल्ले, माजी उपसभापती इमरान खाऩ मुमताज खाऩ व गावातील नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मुसीब भाई, इरफानूलहक, जलील भाई, प्रवीण महल्ले, सुभाष तेलगोटे, जाकीरभाई, गोपाल महल्ले, संजय गावंडे, इरफानभाई, याकुब भाई, जब्बारखा, मतिनभाई, फकिराभाई, राजूभाई, भोरूभाई, अनवरभाई, सलीमभाई, नरीहरी महल्ले, अमजद खान, सादीकभाई, जैनुभाई, देवनाथ भाऊ, मुजिबसेठ, रऊफखा, भिमराव तेलगोट, दीपक तेलगोटे, आरीफभाऊ, जाबिर भाई, मतीनभाई, अलीमभाई, छोंटूभाई, पत्रकार अब्दुल कदीर, मो इमरान तसेच बबलूभाई, साबीर भाई, गजेंद्र तेलगोटे, व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# तालुक्यातील ३९ ग्रा. पं. वर 'प्रशासक राज'

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**अकोट:** तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या ३९ ग्रामपंचायतींचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. त्यामुळे आता या ग्रामपंचायतींवर प्रशासकाची नियुक्ती केली जाणार असून, गावातील 'मिनी मंत्रालया'वर आता प्रशासक राज येणार असल्याचे झाले आहे. परिणामी निवडणुकीच्या तयारीत असलेल्या भावी सरपंच आणि उपसरपंचांना आता आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. स्पष्ट

तालुक्यातील ८५ पैकी ३९ ग्रामपंचायतींवर ७ ते ११ फेब्रुवारीदरम्यान प्रशासकीय राज येणार आहे. तालुक्यात ग्रामीण राजकारणाचे केंद्र असलेल्या या ग्रामपंचायतींची मुदत संपल्याने विद्यमान सदस्यांची सत्ता संपुष्टात आली आहे. निवडणुकांचे बिगुल अद्याप वाजले नसल्याने शासनाच्या निर्णयानुसार या गावांचा कारभार पाहण्यासाठी प्रशासकांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

**प्रशासक राजवट संपण्याची प्रतीक्षा**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे गणित निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमावर अवलंबून असणार आहे. तालुक्यातील ग्रामीण राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता असून, निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांना आता प्रशासकीय राजवट संपण्याची वाट पाहावी लागणार आहे.

ग्रामपंचायत निवडणुकीसाठी अनेक इच्छुकांनी गेल्या काही महिन्यांपासून गावात मोर्चेबांधणी सुरू केली होती. भेटीगाठी, कार्यक्रम आणि

विकासकामांच्या नावाखाली मतदारांना आपलेसे करण्याचे प्रयत्न सुरू होते; मात्र आता थेट प्रशासक राज लागू झाल्याने या इच्छुकांच्या उत्साहावर विरजण पडले आहे.

**निवडणूक आयोगाच्या घोषणेकडे लक्ष!**

प्रशासकीय राजवटीत गावातील विकासकामे आणि दैनंदिन प्रश्न सोडवण्याचे आव्हान विस्तार अधिकारी किंवा इतर नियुक्त अधिकाऱ्यांवर असणार आहे. ३९ ग्रामपंचायतींचा कारभार आता विस्तार अधिकारी किंवा शासनाने नियुक्त केलेले प्रशासक पाहणार आहेत; मात्र कार्यकाळ संपल्याने आता सर्वांचे लक्ष निवडणूक आयोगाच्या आगामी कार्यक्रमाकडे लागले आहे.

# आयटीबीपी जवान हरिओम जामोदे यांचे जंगी स्वागत

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी



**तेल्हारा :** भारत-तिबेट सीमा पोलीस दल (आयटीबीपी) मध्ये कार्यरत जवान हरिओम रविंद्र जामोदे यांनी जिद्द चिकाटी व अथक परिश्रमाच्या जोरावर हरियाणा येथे ११ महिन्यांचे अत्यंत खडतर, शिस्तबद्ध व कठीण प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर तेल्हारा नगरीत आगमन झाले. तेव्हा मित्रपरिवार, नातेवाईक व नागरिकांनी जल्लोषात स्वागत करून अभिमान व्यक्त केला.

हरियाणा येथील प्रशिक्षण काळात हरिओम जामोदे यांनी कठोर शारीरिक सराव, शस्त्र प्रशिक्षण, शिस्त, सहनशक्ती व मानसिक कणखरतेची कसोटी पाहणारे अनेक टप्पे यशस्वीपणे पार पाडले. गरीब तसेच प्रतिकूल परिस्थितीत आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता देशसेवेचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्यांनी हे प्रशिक्षण पूर्ण केले, ही तेल्हारा शहरासाठी अभिमानाची बाब आहे हरिओमचे तेल्हारा नगरीत आगमन होताच ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढून फुलांच्या हारांनी व घोषणांनी त्यांचे स्वागत करण्यात आले. मित्रपरिवार व कुटुंबीयांनी जल्लोष करत ङ्खभारत माता की जयङ्क व ङ्खजय जवानङ्कच्या घोषणा दिल्या. यावेळी विश्व हिंदू परिषद बजरंग दल व तेल्हारा विकास मंचच्या कार्यकर्त्यांसह सह अनेक नागरिकांनी उपस्थित राहून हरिओम जामोदे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्यात.

हरिओम जामोदे म्हणाले की, देशसेवा करण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य असून, या प्रवासात कुटुंबीय, मित्र व गुरुजनांचा मोठा पाठिंबा लाभला. भविष्यातही देशाच्या सुरक्षेसाठी प्रामाणिकपणे कर्तव्य बजावण्याचा निर्धार व्यक्त केला.

# कृषी विद्यापीठ परिसरातील रस्त्याची दुरुस्ती

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी



**अकोला :** राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माजी प्रदेश सरचिटणीस सुनीता ताथोड यांनी १० जानेवारी २०२५ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसरातील रस्त्याच्या दुरुस्तीबाबत आमदार रणधीर सावरकर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती. या मागणीनंतर त्यांनी सातत्याने करत नागरिकांच्या समस्येकडे लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधले. पाठपुराव्याची दखल घेत आमदार सावरकर यांनी रस्त्याची दुरुस्ती करण्याचे आदेश दिले. परिणामी, कृषी विद्यापीठ परिसरातील गुडमॉर्निंग पथक प्रेमी, महिला तसेच स्थानिक नागरिकांना आता चांगल्या दर्जाचा व सुरक्षित रस्ता उपलब्ध झाला आहे.

या रस्त्यामुळे सकाळी व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, परिसरातील वाहतूकही अधिक सुरळीत झाली आहे. या कामासाठी आमदार सावरकर यांच्यासह नगरसेवक जयंत मसने, नगरसेविका सुनीता

अग्रवाल यांचे सुनीता ताथोड, श्रद्धा कौसल, सीमा चव्हाण, कविता पारस्कर, वृंदा कोरपे, उषा ठाकरे, शोभा बोळे, पुष्पा बनसोड, संगीता जैन, सुषमा निचळ, सावरकर यांच्यासह स्थानिक नागरिकांनी मनापासून आभार मानले आहेत. लोकप्रतिनिधींच्या तत्परतेमुळे आणि जनहिताच्या दृष्टिकोनातून घेतलेल्या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्पाचा डोनेट युवर सायकल उपक्रम

**अकोला:** अँडण धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प आणि निलेश देव मित्र मंडळाच्या ठडोनेट युवर सायकलठ उपक्रमामुळे गरजू आणि अनाथ मुलांना शिक्षणासाठी मोठी मदत मिळणार आहे.

सायकल मिळाल्याने मुलांना शाळेत आणि शिकवणी वर्गात जाणं सोपं होईल, विशेषतः मुलींसाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षणाकडे त्यांचा प्रवास अधिक सुलभ होईल आणि अभ्यासासाठी अधिक वेळ मिळेल. कोणाकडे वापरण्यात नसलेली सायकल असेल, तर त्यांनी १६ फेब्रुवारी पर्यंत अॅड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प, पुष्कर अपार्टमेंट, सातव चौक, अकोला येथे सायकल जमा करावी. शिवजयंती, १९ फेब्रुवारी रोजी गरजू मुलांना सायकली वाटप करण्यात येणार आहेत असे नगरसेवक निलेश देव आणि सहका-यांनी कळवले आहे.

# अकोल्यात शुक्रवारी पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**अकोला:** नोकरी इच्छूक उमेदवारांना खासगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राने दि. ६ फेब्रुवारी रोजी पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे.

मेळाव्यात ३ नामांकित कंपनीव्दारे एकूण ८५ पदांची भरती करण्यात येत आहे. यामध्ये दहावी, बारावी, आयटीआय, पदवीधर उमेदवारांना संधी उपलब्ध आहेत. मेळाव्यासाठी ऑनलाईन अर्ज https://ro®ar.mahaswayamed.goved.in/#/home/in&s या वेबपोर्टलच्या करावा. दि. ६ फेब्रुवारीस मुलाखतीसाठी रोजगार मेळाव्यास प्रत्यक्ष सकाळी ११ ते २ या वेळेत उपस्थित राहावे.

ऑनलाईन सहभागासाठी प्रक्रिया www. mahaswayamed.goved.in या संकेतस्थळाला भेट द्या. ंस्ज्त्दब्सहू या टॅबवर क्लिक करा. व्दं एावे हा पर्याय निवडून आपला सेवायोजन नोंदणी क्रमांक किंवा आधार क्रमांक व पासवर्ड वापरुन साईन इन करा. आपल्या होम पेजवरील व्दं ईंग हा पर्याय निवडा. अ्रैग्मू मध्ये ंव्र्दे जिल्हा निवडून इग्तू बटनवर क्लिक करा नंतर दिनांकीत मेळावा निर्दनास येईल त्यासमोर असलेल्या ंम्रूदह बटनाच्या खाली न्नौ वें ंज्ज्त्ब् बटन दिसेल. तद्नतंतर मेळाव्यास उपस्थित राहणारे उद्योजक व त्यांच्याकडील पदांबाबत माहिती दिसेल. आपल्या पात्रतेनुसार पदाची निवड करुन ंज्ज्त्ब् बटनवर क्लिक करा. घ्ुंाा हा पर्याय निवडा. शेवटी एल्म्र्मेल्त्ब् ंज्ज्त्ग् दैू प व्दं असा मॅसेज दिसेल अशा रितीने आपण ऑनलाईन सहभाग नोंदवू शकता.

दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते २ या कालावधीमध्ये जास्तीत जास्त नोकरी इच्छूक उमेदवारांनी आपला बायोडाटा, शैक्षणीक कागदपत्रे, तसेच पासपोर्ट साईज फोटो व इतर आवश्यक कागदपत्रासह जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, २ रा माळा, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला येथे स्वखर्चाने उपस्थित राहून संधीचा लाभ घ्यावा. मेळाव्यासंबंधीत अधिक माहिती करिता या कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०७२४ २४३३८४९ किंवा ७०२४२४१०९८ / ९४२१४२५०६६ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्तांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

गुरुवार, दि. ०५ फेब्रुवारी २०२६

https://epaper.citynewssuperfast.com

## पगार थकीत; घंटागाडी कर्मचाऱ्यांचा नगराध्यक्षांच्या निवासस्थानावर मोर्चा

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**यवतमाळ :** शहराच्या स्वच्छतेची जबाबदारी असलेल्या यवतमाळ शहरातील घंटागाडी कर्मचा-यांचे गेल्या दोन महिन्याचे वेतन थांबले आहे. त्यामुळे घंटागाडी कर्मचा-यांची आज सकाळी नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांच्या निवासस्थानावर मोर्चा काढला. कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, गेल्या दोन महिन्यांपासून पगार रोखला जात आहे. त्यांना दरमहा फक्त १०,१०० रुपये मिळत आहेत. एवढ्या तुटपुंज्या पगारावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले असून, अनेक घरांमध्ये उपासमारीची परिस्थिती निर्माण झाली आहे. किमान वेतनानुसार पगार देणे, सात महिन्यांपासून थकीत असलेला पीएफ तात्काळ जमा करणे, सकाळची ड्युटी पूर्ण केल्यानंतर सायंकाळी पुन्हा कामावर न गेल्यास पगार कपात थांबवणे अशी मागणी केली आहे. कर्मचार्यांकनी दिलेल्या इशाऱ्यानंतर, नगरपालिकेवर दबाव वाढला असून, शहरातील स्वच्छता सेवा ठप्प होऊ नये याची संपूर्ण प्रशासनाने काळजी घेण्याची गरज आहे. सोशल मीडिया काँग्रेस कमिटी, शहर काँग्रेस कमिटी, वंचित बहुजन आघाडी आणि शेतकरी चळवळीचे नेते उपस्थित राहून घंटागाडी कर्मचाऱ्यांना पाठिंबा दिला.

# दारू पिवून त्रास दिल्याने इसमाचा खून; मुलगा व पत्नी जेरबंद

## पैनगंगा नदीतील कुजलेल्या मृतदेहाचे रहस्य उलगडले

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**यवतमाळ :** पैनगंगा नदीपात्रात सापडलेल्या कुजलेल्या व अनोळखी मृतदेहाची ओळख पटविण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले होते. अखेर यवतमाळ पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने सखोल तपासातून या खुनाचा छडा लावला. मृतकाचा मुलगा व पत्नीच या गुन्ह्यात आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे. दारु पिवून सतत त्रास देत असल्याने सदर इसमाचा खून केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

प्रदीप मारोती डुकरे (२५), पार्वती मारोती डुकरे (५५), रा. जलधरा, ता. किनवट, जि. नांदेड अशी आरोपींची नावे आहे. बिटरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मुरली शिवारात ९ जानेवारी रोजी सहस्त्रकुंड धबधबा परिसरातील कोल्हापुरी बंधाऱ्यात पैनगंगा नदीच्या पात्रात पिवळ्या रंगाच्या फारीत बांधलेला एका पुरुषाचा मृतदेह आढळून आला होता. मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत असल्याने ओळख पटवणे अवघड झाले होते. या प्रकरणी बिटरगाव पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेला तपासाची जबाबदारी देण्यात आली. पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली चार स्वतंत्र तपास पथके तयार करण्यात आली. घटनास्थळी बारकाईने पाहणी करण्यात आली; मात्र मृतकाच्या कपड्यांशिवाय कोणताही ठोस पुरावा मिळाला नाही. त्यानंतर तपासाचा परीघ वाढवत ५० किलोमीटर परिसरातील पोलीस पाटलांशी समन्वय साधून बेपत्ता व्यक्तींची माहिती संकलित करण्यात आली.

याच दरम्यान, गोपनीय बातमीदाराकडून नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील जलधरा गावातील मारोती गंगाराम डुकरे हे बेपत्ता असल्याची माहिती मिळाली. विशेष म्हणजे त्यांच्या बेपत्ताबाबत कोणतीही नोंद करण्यात आलेली नव्हती. या संशयावरून पोउपनि गजानन राजमलू यांच्या नेतृत्वाखाली पथक जलधरा येथे दाखल झाले.

> छळाला कंटाळून पत्नी आणि मुलाने त्यांचा खून करून मृतदेह पिवळ्या फारीत बांधून सहस्त्रकुंड धबधब्याच्या बंधाऱ्यात टाकल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणात प्रदीप मारोती डुकरे (२५), पार्वती मारोती डुकरे (५५), रा. जलधरा, ता. किनवट, जि. नांदेड, यांना पुढील तपासासाठी बिटरगाव पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

मारोती डुकरे यांच्या घरी चौकशी केली असता त्यांचा मुलगा प्रदीप आणि पत्नी पार्वती हेच उपस्थित होते. चौकशीदरम्यान त्यांच्या हालचाली संशयास्पद आढळून आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. पोलीस कौशल्याने अधिक विचारपूस केल्यानंतर त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. दारूच्या व्यसनामुळे मारोती डुकरे हे सतत कुटुंबीयांना व गावकऱ्यांना त्रास देत होते.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तपासात स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि मनीष गावंडे, सपोनि धिरज बांडे, सपोनि पवन राठोड, पोउपनि गजानन राजमलू, पोउपनि शरद लोहकरे, सफौ साजीद, योगेश गटलेवार, मुन्ना आडे, पोहवा संतोष भोरगे, पोह अजय डोळे, प्रशांत हेडाऊ, योगेश डगवार, बबलू चव्हाण, रुपेश पाली, निलेश राठोड, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, रमेश राठोड, कुणाल मुंडोकार, ऋतुराज मेडवे, सचिन घुगे, मिथून जाधव, सोहेल मिझ, पोना किशोर झेंडेकर, पोशि सुनील पंडागळे, आकाश सूर्यवंशी, अमित झेंडेकर, देवेंद्र होले, सुनील पैठने, मपोना ममता देवतळे, चापोउपनि रविंद्र शिरामे, पोशि राजेश जाधव, चापोशि अमित कुमरे यांच्यासह बिटरगाव ठाण्याचे सपोनि पांडुरंग शिंदे, पोउपनि सागर अन्नमवार यांनी केली.



## न. प.च्या उर्दू शाळेत देशद्रोही गाण्यावर विद्यार्थ्यांचे नृत्य

### शिक्षकांविरुद्ध गुन्हा दाखल करा; भाजपाची पोलिसात तक्रार

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी



**उमरखेड :** उमरखेड नगर परिषदेच्या अब्दुल गफूर शाह उर्दू शाळा क्रमांक २ मध्ये प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात देशविरोधी असल्याचा आरोप असलेल्या गाण्यावर विद्यार्थ्यांकडून गायन व नृत्य सादर करण्यात आले. या घटनेमुळे खळबळ उडाली असून, भारतीय जनता पार्टीने (भाजपा) याप्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

या वेळी "ए मर्द-ए-मुजाहिद तेरी यलगार कहा है" हे गाणे सादर करण्यात आले. हे गाणे १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान पाकिस्तानकडून सैनिक आणि नागरिकांना युद्धासाठी उत्तेजित करण्यासाठी वापरले गेले होते, असा दावा भाजपाकडून करण्यात आला आहे. हे गाणे आजही पाकिस्तानच्या लष्करी व राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये गायले जाते, असा आरोप आहे. गाण्यात "तलवार कोठे आहे?" असे विचारून लोकांना तलवार उचलण्याची चिथावणी दिली जाते, ज्यामुळे देशाच्या विरोधात उग्र भावना निर्माण होऊ शकतात, असे भाजपा नेत्यांचे म्हणणे आहे. भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेश काळेश्वरकर यांनी ४ फेब्रुवारी रोजी विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. त्यांनी म्हटले की, निरागस विद्यार्थ्यांकडून असे देशविरोधी गाणे गाऊन आणि नृत्य करवून घेणे हे मुख्याध्यापक व शिक्षकांनी केलेले देशद्रोही कृत्य आहे. हे भारतीय संविधानाच्या कलम २८ च्या विरोधात आहे, कारण सरकारी शाळेत धार्मिक गाण्यांना बंदी आहे.

भाजपाचे नगरसेवक गोपाल कलाने यांनी २ फेब्रुवारी रोजी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यात मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा प्रशासन, नगराध्यक्ष व शिक्षण सभापती यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. कार्यक्रमाच्या वेळी नगर परिषदेचे पदाधिकारी उपस्थित असतानाही त्यांनी थांबवण्याचा प्रयत्न केला नाही, असेही आरोप आहेत. काळेश्वरकर म्हणाले, "शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या मनावर देशविरोधी विचार रुजवण्याचा प्रयत्न झाला आहे. यामागे कोण आहे? याची सखोल चौकशी व्हायला हवी. दोषींवर गुन्हा दाखल होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही." यावेळी भाजपाचे गटनेते विजय हरडपकर, शहर अध्यक्ष अतुल खंदारे, नगरसेवक अमोल तीवरंगकर, पवन मेंढे, बबलू मैड उपस्थित होते. या प्रकरणाची अधिक तपासणी सुरू असून, संबंधितांवर कारवाई होईल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे रा.से.यो.शिबीर

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी



**वणी:** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्न, शिक्षण प्रसारक मंडळ संचालित लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी चे रा.से.यो. विशेष श्रम संस्कार शिबीर नुकतेच दत्तक ग्राम वांजरी येथे संपन्न झाले.

या शिबिराचे उद्घाटन अध्यक्ष विजय मुकेवार यांच्या अध्यक्षतेखाली शिबीर, साप्ताहिक ग्रंथालयाचे उद्घाटन करण्यात आले. शाश्वत विकासासाठी पाणलोट व्यवस्थापन आणि पडिक जमीन विकास या उपक्रमावर आधारित शिबीर विद्यार्थ्यांसाठी व गावकऱ्यांसाठी वैशिष्ट्यपूर्ण ठरले. शिबिरात घनकचऱ्याचे व्यवस्थापन, स्मशानभूमी स्वच्छता, घर घर संविधान, जलप्रकल्प, वृक्षारोपण, इको ब्रिक्स वर्कशॉप, महिला सक्षमीकरण, बालविवाह मुक्त भारत, मतदान जनजागृती अशा अनेक उपक्रमांचा समावेश होता. विशेष बौद्धिक सत्रात प्राचार्य डॉ. प्रसाद खानझोडे यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारधारेवर मार्गदर्शन केले, तर अमर कातोरे यांनी रा.से.यो. विद्यार्थ्यांसाठी जीवनातील महत्त्वाचे मुद्दे समजावले. साधना डोंगे, अनुसया खारकर यांची उपस्थिती विशेष होती. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी डॉ. स्वानंद पुंड, प्रा. अंजली आत्राम, डॉ. सुवर्णा चरपे, रूपेश रेगे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. आरोग्य तपासणी, जलसंधारण उपक्रम, स्वयंप्रतिकारक रोगांविरुद्ध मार्गदर्शन, वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियान या उपक्रमांमुळे शिबीर सर्वांगीण विकासासाठी संस्मरणीय ठरले. सांस्कृतिक कार्यक्रमात डॉ. दिलीप अलोने यांच्या नेतृत्वाखाली पथनाट्य, हास्य नाटिका आणि नृत्याद्वारे गावकरी आणि विद्यार्थी प्रबोधनाचे माध्यम बनले. शिबीराच्या समारोप सत्रात अध्यक्ष विजय मुकेवार यांनी रा.से.यो. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे महत्त्व सांगितले, तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रसाद खानझोडे यांनी राष्ट्रीय सेवा योजना मानवतेशी जोडणारा पुल असल्याचे सांगितले. शिबीरात उपसरपंच अमोल कुंभारे, सरपंच अरुणाताई जेनेकर, जि.प. शाळा मुख्याध्यापक हेमंत तिमांडे, विकास जेनेकर, डॉ. निलेश कडू तसेच विविध शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू द्या



प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**झरी जामणी :** झरी तालुक्यातील विविध घरकुल योजनांतील लाभार्थ्यांना शासन धोरणानुसार मोफत वाळू उपलब्ध करून देण्यात यावी, या मागणीसाठी सरपंच संघटना व स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या वतीने तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले. ग्रामपंचायत प्रतिनिधी व कार्यकर्त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली.

> सरपंच संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, केंद्र व राज्य शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना तसेच अन्य घरकुल योजनांअंतर्गत तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांना घरे मंजूर झाली आहेत. मात्र, घरकुल बांधकामासाठी आवश्यक असलेली वाळू वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे अनेक घरे अद्याप अपूर्ण अवस्थेत आहेत. काही ठिकाणी बांधकाम जोत्यापर्यंत, तर काही ठिकाणी स्लॅब पातळीवरच अडकले आहे. मागील वर्षी काही लाभार्थ्यांना मोफत वाळूचे वाटप करण्यात आले होते. तथापि, आजही मोठ्या संख्येने लाभार्थ्यांना वाळू मिळालेली नाही. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अपूर्ण बांधकामांचे नुकसान होण्याची शक्यता असून, वाळूअभावी लाभार्थ्यांना आर्थिक व मानसिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने संवेदनशील भूमिका घेऊन सात दिवसांच्या आत प्रत्येक घरकुल लाभार्थ्याला किमान पाच ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून द्यावी, अन्यथा शासन निर्णयानुसार गावालगतच्या अधिकृत वाळू घाटातून वाळू आणण्याचा पर्याय स्वीकारला जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. निवेदन सादर करताना निलेश येल्टीवार, राहुल धांडेकर, राकेश गालेवार, श्रीकांत अनमूलवार, सुकेश शिरपूरकर, दत्ता परचाके, आशीफ कुरेशी, अविनाश डुकरे, अंकित खडसे, रामदास आत्राम, सतीश दूधकोहळे, देवराव उईके आदी उपस्थित होते.

## ९ फेब्रुवारीला वृद्ध कलाकारांच्या मुलाखती

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**बाभूळगाव :** महाराष्ट्र शासनाच्या राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलाकार मानधन योजना अंतर्गत तालुक्यातील ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांसाठी मुलाखत व निवड चाचणी प्रक्रिया सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही प्रक्रिया पंचायत समिती, बाभूळगाव येथील सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत होणार आहे.

सन २०२२ ते २०२६ या कालावधीत तालुक्यातील सुमारे १३५ वृद्ध साहित्यिक व कलाकारांनी या मानधन योजनेंतर्गत अर्ज सादर केले होते. यापैकी पात्र ठरलेल्या अर्जदारांची मुलाखत व निवड चाचणी या दिवशी घेण्यात येणार आहे.

ही प्रक्रिया निवड समितीचे सदस्य चिंतांगराव गणपतराव कदम, गजानन किसन फोफसे तसेच सहाय्यक गटविकास अधिकारी गजानन धर्माळे (पंचायत समिती, नेर) यांच्या उपस्थितीत पार पडणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

मुलाखतीस येताना संबंधित वृद्ध कलाकारांनी आपली आवश्यक वेशभूषा, कला सादरीकरणासाठी लागणारे साहित्य सोबत आणावे, तसेच ठरलेल्या वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांनी केले आहे.

या योजनेच्या माध्यमातून ज्येष्ठ कलाकारांना सन्मानासह आर्थिक आधार मिळणार असल्याने तालुक्यातील कलावंतांमध्ये या निवड प्रक्रियेबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

## सवना जि.प. कन्या शाळेत शिक्षकच नाहीत; ५० विद्यार्थिनींचे शिक्षण वाऱ्यावर

### खिचडी शिजवणाऱ्या महिलांच्या भरवशावर शाळा सुरू

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी



**महागाव :** राज्य शासनाकडून 'डिजिटल शाळा' आणि 'स्मार्ट क्लासरूम'चे ढोल वाजवले जात असताना, ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेचे विदारक वास्तव समोर आले आहे. महागाव तालुक्यातील सवना येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेत गेल्या अनेक दिवसांपासून एकही शिक्षक कार्यरत नसल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग असलेल्या या शाळेत सुमारे ५० विद्यार्थिनींचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे.

विद्यार्थिनी रोज शाळेत येतात, दप्तर ठेवतात; मात्र शिकवायला शिक्षक नसल्याने दिवसभर खेळून घरी परततात. काही वेळा शाळा उघडणे, स्वच्छता राखणे तसेच देखरेखीचे काम खिचडी शिजवणाऱ्या महिला व ग्रामस्थांच्या भरवशावर सुरू आहे. हा प्रकार म्हणजे शिक्षण विभागाच्या ढिसाळ आणि बेजबाबदार कारभाराचा कळस असल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे.

या परिस्थितीचा निषेध करत संतप्त पालकांनी आपल्या मुलींना घेऊन थेट पंचायत समिती कार्यालय गाठले आणि गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनातच शाळा भरविली. 'शिक्षण सर्वांसाठी' आणि 'मुली शिकवा, मुली वाचवा' या घोषणा केवळ जाहिरातबाजीपुरत्याच मर्यादित राहिल्या आहेत का, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. आरटीई कायद्यानुसार ठराविक विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक नियुक्ती बंधनकारक असताना, ५० विद्यार्थिनी असलेल्या शाळेत शिक्षकसंख्या शून्य कशी? शिक्षण विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे.या गंभीर प्रश्नाबाबत ग्रामस्थ व पालकांनी ग्रामपंचायत तसेच शिक्षण विभागाकडे वारंवार लेखी व तोंडी तक्रारी केल्या. मात्र प्रशासनाने अद्याप ठोस पावले उचललेली नाहीत. यामुळे जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या निष्काळजीपणामुळे ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थिनींचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे चित्र आहे. तातडीने कायमस्वरूपी शिक्षकांची नियुक्ती न झाल्यास शिक्षण विभागावर धडक मोर्चा काढून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थ व पालकांनी दिला आहे. या प्रकारानंतर तरी संबंधित वरिष्ठ अधिकारी दखल घेणार की विद्यार्थिनींचे नुकसान असेच सुरू राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पारवा जि. प. कन्या शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**पारवा :** तालुक्यातील पारवा जिल्हा परिषद प्राथमिक मराठी कन्या शाळेत स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कलाविष्कारांमुळे कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.





दैनंदिन अभ्यासासोबतच विद्यार्थिनींच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने मुख्याध्यापिका गीता मानकर यांच्या पुढाकारातून स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थिनींनी प्रमुख पाहुण्यांचे शाळेच्या मुख्यद्वारापासून स्वागत करून त्यांना मंचावर आणले.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी महिला मेळाव्यात उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या महिलांचा तसेच बाल आनंद मेळाव्यात कमी गुंतवणुकीत अधिक उत्पन्न मिळवणाऱ्या आणि क्रीडा क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हेमंत ठाकरे होते. उद्घाटक म्हणून पारवा पोलीस स्टेशनचे ठाणेदार हेमंत चौधरी लाभले. प्रमुख अतिथी म्हणून ग्रामपंचायत सदस्य बालाजी पोटपिल्लेवार, राजू दवणे, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष उषा चौधरी, पारवा केंद्राच्या केंद्रप्रमुख मिना धोटे, प्रमोद दोडावार, सेवानिवृत्त शिक्षक अशोक जिल्डवार, घाटंजी तालुका मराठी पत्रकार बहुउद्देशीय संस्थेचे उपाध्यक्ष दिनेश गाऊत्रे, संदीप जयस्वाल, अमोल उदार, लिटिल चॅम्प इंग्लिश मिडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना आरेवार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थिनींनी गाण्यांवर आधारित नृत्य सादर करून उपस्थित मान्यवर, पालक व प्रेक्षकांची मने जिंकली. चिमुकल्या विद्यार्थिनींसाठी पालकांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेत खाऊसाठी बक्षिसांच्या स्वरूपात हजारो रुपयांची रक्कम दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षक प्रशांत भेदूरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका गीता मानकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गिरीष सुकंडवार व माता-पालकांचे विशेष सहकार्य लाभले.

## हरित स्पंदन कार्यक्रमाचा समारोप

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी



**पुसद :** श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात आयोजित 'हरित स्पंदन' या पर्यावरणपूरक उपक्रमाचा समारोप महाविद्यालयाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष ॲड. मोहिनी नाईक उपस्थित होत्या. विशेष अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी आशिष बीजवल तर पुसद गार्डन क्लबचे अध्यक्ष दीपक आसेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कार्यकारी प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे, मिशन ग्रीनचे अध्यक्ष रमेश डंबोळे, प्रा. डॉ. उज्वला तिखे, प्रा. सुरेखा भगत, महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग व निसर्गप्रेमी नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्रीमती वत्सलाबाई नाईक यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. प्रा. डॉ. उज्वला तिखे यांनी प्रास्ताविकातून विविध स्पर्धांचा आढावा सादर केला.

विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे व मानचिन्हे देण्यात आली.अध्यक्षीय समारोपात नगराध्यक्ष मोहिनी नाईक यांनी पुसद शहर हिरवेगार करण्याचा संकल्प व्यक्त केला. समारोपप्रसंगी रूपाली सूर्यवंशी, राजश्री अर्धापूरकर, वैशाली गायकवाड व प्रा. श्रद्धा भवरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दीपकभाऊ आसेगावकर, रमेश डंबोळे, पवन बोजेवार, नयन रामधनी, निर्भय बंड्रफ, निखिल गादेवार तसेच सर्व सभासदांचे सहकार्य लाभले. सुमित नर्सरीचे संचालक सुमित टेटर यांचेही उल्लेखनीय योगदान लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रवीप्रकाश चापके यांनी केले तर आभार प्रा. सुरेखा भगत यांनी मानले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि.५ फेब्रुवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## शासन पूरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीचा जिल्हास्तरीय आढावा

**वाशीम :** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी), प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (पीएमईजीपी) व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (पीएमएफएमई) यांसह विविध शासन पूरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून प्रलंबित सर्व प्रकरणे तात्काळ निकाली काढावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली शासन पूरस्कृत योजनांचा जिल्हास्तरीय आढावा घेण्यात आला. यावेळी ते बोलत होते. सीएमईजीपी, पीएमईजीपी आणि पीएमएफएमई या योजनांच्या माध्यमातून सुशिक्षित बेरोजगार युवक, महिला, अनुसूचित जाती-जमाती, अल्पसंख्याक व नवउद्योजकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे. या बैठकीस अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक पुनम घूले, कृषी उपसंचालक हिना शेख यांच्यासह विविध राष्ट्रीयीकृत, खासगी व सहकारी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## संत बिरबलनाथ यात्रेत वरून कीर्तन वरूनच तमाशा...



# भाजप जोपासतोय संस्कृती, आमदार महोत्सवात विकृती !


सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि.३० डिसेंबर २०२५
आमदाराच्या नीतिमत्तेची हद्द, व्हायरल ऑडिओतून सिद्ध, म्हणे, जिल्हाध्यक्षच्या पत्नीला पाडा खुद्द ?

### *आमदाराला भाजपच्या संस्कृतीचा विसर * यात्रा महोत्सवात 'लावणी' चे आयोजन *लाडक्या बहिणीसह ज्येष्ठ नागरिकांकडून 'धुरंदर' आमदाराबाबत नाराजी व्यक्त

● अतिष देशमुख @ वाशीम ●

सुसंस्कृतपणाचा आव आणणाऱ्या आणि भारतीय संस्कृतीचे गोडवे गाणाऱ्या भाजपच्या आमदारानेच वाशीम जिल्ह्यातील मंगरूळनाथ येथील आराध्य दैवत असलेल्या संत बिरबलनाथ महाराजांच्या यात्रा महोत्सवाच्या कार्यक्रमात चक्क मंगळवार ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सायली पाटील यांच्या लावणीच्या कार्यक्रमाचे आयोजन करून हजारो लाडक्या बहिणींसह ज्येष्ठ नागरिकांची नाराजी ओढवून घेतल्याची चर्चा आहे. स्वतःला 'धुरंदर ' म्हणवून घेणाऱ्या भाजपच्या आमदारानेच लावणीचे आयोजन करून भाजपच्या सुसंस्कृतपणावर प्रश्नचिन्ह उभे केले असल्याची जिल्हाभरात उलट-सुलट चर्चा आहे.








जगभरात भारतीय संस्कृतीचे गुणगान करणाऱ्या भाजपच्या वाशीम विधानसभा मतदारसंघाच्या भाजपच्या आमदारानेच भारतीय संस्कृतीचे वाभाडे काढून हजारो 'नारीशक्ती'ची नाराजी ओढवून घेतल्याची चर्चा चविष्ठपणे चर्चिल्या जात आहे. सव्वा वर्षापूर्वी राज्यात पार पडलेल्या विधानसभा निवडणूकीत वाशीम विधानसभा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार श्याम खोडे हिंदुत्वाच्या लाटेत निवडूण आलेत. प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या फाजील आत्मविश्वासामुळेच त्यांना त्या निवडणूकीत पराभव पत्करावा लागला. फक्त हिंदुत्वाच्या लाटेत आणि हजारो लाडक्या बहिणींनी त्यांच्या मताचा कौल श्याम खोडे यांना दिल्यानेच त्यांना या प्रतिष्ठेच्या निवडणूकीत विजय मिळाला हे सुद्धा त्रिकालाबाधीत सत्य आहे.

मंगरुळनाथ येथील आराध्य व ग्राम दैवत असलेल्या संत बिरबलनाथ महाराजांची यात्रा दरवर्षी मोठ्या उत्साहाने मंगरूळनाथ नगरीमध्ये भरते. या यात्रेत विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केल्या जात होते. परंतु योगायोगाने मंगरूळनाथ नगरीचे रहिवाशी असलेले वाशीम मतदारसंघाचे भाजपचे आमदार असलेल्या आमदार श्याम खोडे यांनी संत बिरबलनाथ महाराजांच्या यात्रा महोत्सवाला 'राजाश्रय' देवून मागील वर्षीपासुन मंगरूळनाथ नगरीत या यात्रामहोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमआणि स्पर्धा कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी पुढाकार घेतला. आमदार श्याम खोडे यांनी यावर्षी या यात्रामहोत्सवात चक्क सायली पाटील यांच्या लावणीच्या कार्यक्रमाचे आयोजन करून त्यांचा 'बिलंदरपणा' दाखवून हजारो लाडक्या बहिणींची व ज्येष्ठ नागरिकांची नाराजी ओढवून काय साध्य केले ? असा सवालही केल्या जात आहे. तसेच सोशल मिडीयावरसुद्धा या कार्यक्रमाबाबत अनेकजण उलट-सुलट प्रतिक्रिया व्यक्त करून धुरंदर आमदाराच्या नारीशक्तीचा अपमान करणाऱ्या कार्याचा निषेध व्यक्त करत असल्याचे समजते.

आमदार श्याम खोडे यांनी फक्त आंबटशौकिनांना खुश करण्याच्या मोठेपणात भाजपच्या सुसंस्कृतपणाचा अवमान केल्याचाही नारीशक्तीकडून निषेध व्यक्त केल्या जात असल्याची समाज माध्यवर चर्चा आहे.

### आमदार साहेब तुम्ही चुकलात.. सोशल मीडियावर निषेध

लावणी हा महाराष्ट्राचा नृत्य प्रकार आहे. मात्र कोणता कार्यक्रम कुठे कधी आणि केव्हा घ्यायचा याचे भान असावे लागते. याशिवाय जनतेच्या समस्येची ही जाण असावी लागते. आमदारांनी यात्रा महोत्सवात लावणी कार्यक्रम घेतल्याने डॉक्टर, वकील महिलांसह लाडक्या बहिणींनी जेष्ठ नागरिकांनी सोशल मीडियावर आमदार साहेब तुम्ही चुकलाच अशा पोस्ट करत जाहीर निषेध केला.




## थोडक्यात

### आत्मशक्तीच्या जोरावर यशाची झेप !



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिमकरांचा लाडका बाल समुपदेशक व लेखक म्हणून ओळख असलेल्या अवघ्या १२ वर्षीय विराज शिंदे याची ५३ व्या राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनासाठी (दिव्यांग श्रेणी) निवड झाली आहे. ही निवड वाशिम जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरत आहे. ज्ञानेश्वर माऊली विद्यालय, कोंडाळा महाली येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात वाशिमचे बहुपरिचित विधानपरिषद सदस्य किरणराव सरनाईक तसेच माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांच्या हस्ते विराजला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले होते.

आय.एस.टी.एस.ई. या प्रतिष्ठित टॅलेंट स्पर्धेत विराजने आंतरराष्ट्रीय क्रमांक ९ मिळवला आहे. ई.आय. असेट या नॅशनल टॅलेंट स्पर्धा परीक्षेत त्याला कांस्य पदक प्राप्त झाले आहे. रामानुज मॅथ चॅलेंज या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत यावर्षी त्याने राष्ट्रीय क्रमांक ११ पटकावला आहे. तसेच एलिमेंट्री ड्रॉईंग परीक्षेत त्याला अ श्रेणी प्राप्त झाली आहे. या यशामागे समन्वयक विजय भड व भास्कर सर यांच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा असल्याचे मत विराजने नमूद केले आहे.

### आद्य क्रांतिकारी समाजसुधारक संत रविदास महाराजांचे विचार सदैव उपयुक्त -प्रा.डॉ.संतोष इंगोले

वाशीम येथे संत रविदास महाराज जयंती उत्साहात



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

संत रविदास महाराजांनी प्रतिकूल परिस्थितीतही अध्यात्मा सोबतच समाज सुधारण्याचे कार्य करून समाजाला योग्य दिशा देण्याचे काम केले.

त्यामुळे त्यांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनामध्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन प्रा डॉ संतोष इंगोले यांनी व्यक्त केले. स्थानिक ढोके हॉस्पिटल येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने भव्य प्रमाणात संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची जयंती ता १ रोजी उत्साहात साजरी करण्यात आली .कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी प्रा प्रभाकर वजीरे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेश उपाध्यक्ष समाधान माने, जिल्हाध्यक्ष डॉ. दीपक ढोके, ज्येष्ठ आघाडी जिल्हाध्यक्ष किसनराव खंडारे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सौ विमलताई राजगुरू, संगीताताई राजगुरू, सीताताई वाघमारे नगरसेवक राहुल तूपसांडे,, निवृत्त पीएसआय बबनराव खिराडे, तालुकाध्यक्ष चंद्रकांत उचितकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे संचालन जिल्हा सचिव संतोष आमले तर प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष डॉ दीपक ढोके यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. गजानन खंदारे यांनी मानले.

यावेळी बहुसंख्य समाज बांधव उपस्थित होते.

### जि.प. पाणीपुरवठा विभागातील दोन लाचखोरांना ५ वर्षे सक्तमजुरी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागातील तत्कालीन सहायक लेखा अधिकारी आणि कनिष्ठ सहायक यांना २० हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाने बुधवारी (४ फेब्रुवारी) दोषी ठरवत ५ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. तसेच दोन्ही आरोपींना प्रत्येकी ५० हजार रुपये दंडही ठोठावण्यात आला आहे.

सुभाष मोतीराम इंगळेङ (सहायक लेखा अधिकारी, वर्ग-३) आणि ङनिलेश मधुकर लंगोटेङ (कनिष्ठ सहायक, वर्ग-३) अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत. २००८ मध्ये भारत निर्माण योजनेअंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या निधीचा तिसरा हप्ता मिळवून देण्यासाठी आरोपींनी तक्रारदाराकडे २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यापैकी १७ हजार रुपये सुरुवातीला स्वीकारल्यानंतर, उर्वरित ३ हजार रुपये ३० मे २००८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ँणॅ) रचलेल्या जाळ्यात आरोपींनी स्वीकारले. याप्रकरणी वाशिम पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयाचा निकाल

विद्यमान जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम यांनी आज दोन्ही आरोपींना कलम ७ अन्वये ४ वर्षे शिक्षा व २५ हजार रुपये दंड, तसेच कलम १३ अन्वये ५ वर्षे सक्तमजुरी व २५ हजार रुपये दंड अशी एकूण ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. सरकारतर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ङश्रीराम नारायण काळूङ यांनी बाजू मांडली.ही कारवाई पोलीस अधीक्षक बापू बांगर आणि अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली एसीबीच्या पथकाने केली होती.

### स्पर्श प्रणाली ॲपमधून घरकुल धारकांचे पैसे अद्यापही खात्यावर जमा नाही...

## लाभार्थी अडचणीत, प्रशासनाला ताळमेळ लागेना !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

नवीन वर्षात जिल्हा ग्रामीण यंत्रणेने घरकुल लाभार्थ्यांचे पैसे त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यासाठी स्पर्श प्रणाली नावाचे नवीन ॲप आणले. या ॲपद्वारे ४८ तासात पैसे लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होतील, असे सांगण्यात आले, मात्र गेल्या २ते३ महिन्यापासून एकाही लाभार्थ्यांच्या खात्यावर या ॲप मधून पैसे पडले नसल्यामुळे घरकुलधारक अडचणीत सापडले. त्याच बरोबर तालुका पातळीवरील प्रशासकीय अधिकाऱ्यांना याचा ताळमेळ लागत नसल्यामुळे सध्या तरी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. हे ॲप कधी कार्यविनीत होणार? प्रश्न उपस्थित होऊ लागला.



तालुक्यात शेकडो लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळालेला आहे. काहींचे घरकुल पूर्ण झाले आहेत. ज्यांचे घरकुल पूर्ण झाले त्यांचे हप्ते बाकी आहेत. नवीन वर्षात नवीन ॲपद्वारे घरकुल धारकांचे पैसे त्यांच्या खात्यावर वर्ग केले जातात. २०२६ साली जिल्हा ग्रामीण यंत्रणेने स्पर्श प्रणाली द्वारे लाभार्थ्यांचे पैसे खात्यावर टाकले पण २ते३ महिने झाले, अद्यापही पैसे खात्यावर पडले नाहीत. विशेष म्हणजे ४८ तासात खात्यावर पैसे पडतील, असे सांगण्यात आले होते मात्र दोन ते तीन महिने होत आले तरी पैसे खात्यावर पडलेले नाहीत. या ॲपमध्ये काहीतरी बिघाड असावा, त्यामुळेच पैसे पडेना गेले, पैशा संदर्भात लाभार्थी दररोज पंचायत समिती कार्यालयात चकरा मारू मारू बेजार आहेत. तर अधिकाऱ्यांनाही या ॲपबाबत काही कळत नसल्याचे दिसून येऊ लागले. हे ॲप वरूनच असल्यामुळे त्यांना याबाबत काही सांगता येत नाही. येत्या दोन-चार दिवसात तरी या ?प द्वारे पैसे पडणार की नाही, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला. ज्यांनी उसनवारीने घराचे बांधकाम केले ते लाभार्थी मात्र चांगलेच अडचणीत सापडले आहेत.


सिटी न्यूज वाशीम
घरकुल योजनेच्या लाभार्थ्यासाठी 'स्पर्श प्रणाली' ठरली डोकेदुखी

# राष्ट्रध्वजाचा अवमान, एसबीआयला नाही भान !

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

प्रजासत्ताक दिनासारख्या राष्ट्रीय सणाच्या दिवशी राष्ट्रध्वज फडकवणे हे प्रत्येक शासकीय व निमशासकीय संस्थेचे कर्तव्य असताना, केनवड येथील स्टेट बँक ऑफ इंडिया उपशाखेत २६ जानेवारी रोजी राष्ट्रध्वज फडकवण्यात न आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. उपशाखा आहे आणि सिक्युरिटी गार्ड नाही अशी शाखाधिकाऱ्याने कडुन कारणे पुढे करण्यात आली. मात्र ही कारणे कोणत्याही नियमात बसत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या प्रकारामुळे पालकमंत्र्याच जिल्हा प्रशासनावर दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणात संबंधित शाखाधिकाऱ्याने फक्त पैशापुरतेच काम केले असल्याचा थेट आरोप होत आहे. राष्ट्रध्वजाच्या दिवशी ना तो शाखेत उपस्थित होता, ना शाखा उघडली गेली, ना राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. उलट




### वरिष्ठांना नाही राहली कर्तव्याची जाण...

संबंधित अधिकारी आपल्या घरीच होता, अशी चर्चा असून, राष्ट्रध्वज, राष्ट्रभावना व राष्ट्रीय सण यांच्याशी त्याचे काहीच देणेघेणे नसल्याचे वर्तनातून दिसते, असा रोखठोक आरोप नागरिक करत आहेत. महिन्याकाठी पगार उचलण्यासाठीच अधिकारी बँकेत येतो का? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. राष्ट्रीयकृत बँक म्हणून केवळ आर्थिक व्यवहार नव्हे, तर राष्ट्रीय मूल्यांची जबाबदारीही पार पाडणे अपेक्षित असते. तज्ज्ञांच्या मते, उपशाखा असणे किंवा गार्ड नसणे हे राष्ट्रध्वज न फडकवण्याचे वैध कारण नाही. उपलब्ध अधिकारी किंवा कर्मचारी झेंडा फडकवू शकतात. तरीही तसे न होणे हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष आणि असंवेदनशीलतेचे द्योतक असल्याचे स्पष्ट होत आहे. या घटनेवर जिल्हा प्रशासनाचे मौनही तितकेच चर्चेचा विषय ठरत आहे. जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये राष्ट्रीय सणांचे पालन होते की नाही, यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी प्रशासनावर असताना, राष्ट्रीयकृत बँकेच्या दारातच राष्ट्रध्वजाचा अपमान होऊनही ठोस कारवाई दिसत नाही, यामुळे संताप वाढत आहे. जिल्ह्याचे पालकत्व दत्तात्रय भरणे यांच्याकडे असताना त्यांच्या जिल्ह्यात असा प्रकार घडणे अधिकच गंभीर मानले जात आहे.

पालकमंत्री असताना प्रशासनावर दबाव नाही का? लक्ष नाही का? असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. राष्ट्रीय सणाच्या दिवशी राष्ट्रध्वज न फडकवला जाणे हा केवळ निष्काळजीपणा नसून, राष्ट्रध्वजाच्या अपमानाचा प्रकार असल्याचे नागरिकांचे स्पष्ट मत आहे.

### कारवाई व्हावी, हीच ठाम मागणी...

या संपूर्ण प्रकरणात केवळ निषेध व्यक्त करून चालणार नाही, तर मुजोर शाखाधिकाऱ्यावर तात्काळ चौकशी करून कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी ठाम मागणी नागरिकांकडून होत आहे. राष्ट्रध्वजाचा अपमान ही गंभीर बाब असून, अशा प्रकारांवर जर वेळीच कारवाई झाली नाही, तर भविष्यात इतर ठिकाणीही अशीच निष्काळजीपणा वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्हा प्रशासन व पालकमंत्री कार्यालयाने या प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन दोषींवर उदाहरणार्थ कारवाई करावी, तसेच सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांना राष्ट्रीय सणांचे पालन सक्तीचे करण्याबाबत स्पष्ट आदेश जारी करावेत, अशी जोरदार मागणी केनवड परिसरातून होत आहे.


केनवड एस बि आय बँकेत तिरंगा न फडकता अडकला !
एसबीआय बँकेत झाले नाही ध्वजारोहण !
राष्ट्रीय ध्वजाचा अपमान सणा-सणाला !

### लाडेगाव येथे तात्काळ पशुवैद्यकीय अधिकारी नियुक्त करा !

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

लाडेगाव व परिसरातील सुमारे १४ ते १५ गावांना सेवा देणारा पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी–२ गेल्या अनेक महिन्यांपासून पशुवैद्यकीय अधिकारी व आवश्यक कर्मचारी नसल्यामुळे प्रत्यक्षात बंद अवस्थेत आहे.

त्यामुळे ग्रामीण भागातील पशुपालक नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असून या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी पत्रकार आशिष धोंगडे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वाशिम यांच्याकडे निवेदन सादर करून तात्काळ नियुक्तीची मागणी केली आहे. या परिसरात पशुधनाची संख्या मोठ्या प्रमाणात असून सध्या लंपी स्किन डिसीजसारख्या संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे. मात्र वेळेवर पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध नसल्यामुळे पशुपालकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. आजारी जनावरांना उपचारासाठी दूरच्या ठिकाणी नेणे ग्रामीण पशुपालकांसाठी खर्चिक व अत्यंत अडचणीचे ठरत आहे. या संदर्भात यापूर्वीही पशुसंवर्धन विभाग तसेच पशुवैद्यकीय कार्यालय, कारंजा (लाड) यांच्याकडे वेळोवेळी लेखी अर्ज व निवेदने सादर करण्यात आली होती तसेच महाराष्ट्र नागरिक सनद नियम २०१५ आणि महाराष्ट्र हक्काने सेवा मिळविण्याचा कायदा २०१५ यांचा उल्लेख करून पशुवैद्यकीय सेवा ही ग्रामीण भागातील अत्यावश्यक सार्वजनिक सेवा असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. लाडेगाव येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी–२ येथे तात्काळ पशुवैद्यकीय अधिकारी व आवश्यक सहाय्यक कर्मचारी नियुक्त करून दवाखान्याच्या सेवा सुरू करण्यात याव्यात, अशी ठाम मागणी पत्रकार आशिष धोंगडे यांनी केली आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# 'परी बिंदी घर' वर चालला बुलडोजर !

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**अकोला :** गांधी रोडवरील परी बिंदी घर च्या माध्यमातून चालणा-या धक्कादायक व संतापजनक प्रकाराला वाचा फुटली. विविध स्तरातून निषेध झाला. तसेच महापालिका प्रशासनाने अतिक्रमणाचा सफाया केला.

'परी बिंदी घर' कॉस्मेटिक दुकान प्रत्यक्षात विकृती, लैंगिक शोषण, ब्लॅकमेलिंग आणि धर्मांतराच्या दबावाचे केंद्र असल्याचे उघड झाले. सिटी कोतवाली पोलिसांच्या माहितीनुसार, पीडितेवर अत्याचार २०२४ ते २०२६ या काळात सुरू होता. पीडितेने तक्रार दाखल केली आणि घृणास्पद रॅकेटचा पर्दाफाश झाला. पीडितेच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात सामूहिक बलात्कारासह गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात चारही आरोपींना अटक करण्यात आली.



या गुन्ह्यात मोहम्मद आसिफ उर्फ बाबू मोहम्मद सलीम तेली व चंदू वानखडे यांना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना ७ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. इमरान खान यासीन खानला अटक केली असून, ६ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. तसेच आरोपी रहेमान उर्फ मोहम्मद मुस्तफा मोहम्मद सलीम तेली याला देखील बुधवारी अटक करण्यात आली असून, उद्या त्याला न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

या प्रकरणातील गंभीर बाब म्हणजे पीडितेवर धर्मांतर करण्याचा दबाव टाकला होता. त्या शिवाय आक्षेपार्ह व्हिडिओ हटवणार नाही असा दबाव आणला. आणि शोषण करण्यात आले असा आरोप आहे. सिटी कोतवालीचे निरीक्षक गवई यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# जागेच्या वादातून महिलेला मारहाण

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**खामगाव :** हिंगणा कारेगाव येथे मंगळवारी जागेच्या वादातून हाणामारीची घटना घडली. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

मिळालेल्या माहितीनुसार, मायावती सुपाजी जाधव (३०, रा. हिंगणा कारेगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सकाळी सुमारे ९ वाजता त्या घरासमोरील कॉलममध्ये माती ओढण्याचे काम करीत होत्या. त्यावेळी आरोपी अंजनाबाई जगन जाधव घटनास्थळी आल्या व काम थांबवण्याची धमकी देत वाद लागल्या. वाद घालू विकोपाला गेल्यानंतर त्यांनी अचानक स्वतःचे डोके दगडावर आपटत आरडाओरड सुरू केली. ही परिस्थिती पाहून आरोपी जगन नामदेव जाधव हा हातात विळा घेऊन घटनास्थळी धावून आला. त्याने फिर्यादीच्या डाव्या हातावर विळ्याने वार केला. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाली असून, मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. तोंडी तक्रार व वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे खामगाव ग्रामीण पोलिसांनी ४ फेब्रुवारी रोजी भा.न्या.सं. कलम ११८ (१), ३५२, ३५१(२), ३५१(३) व ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल किरण राऊत करीत आहेत.

**हिंगणा कारेगाव येथील घटनाः दोघांवर गुन्हा**






# देशमुख महिला मंडळाची 2026 ची पहिली मासिक सभा



प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**अकोला :** महिलांच्या कला गुणांना वाव देत. एकोप्याची भावना आणि सामाजिक जाणिव वाढवण्याचा उद्देश जपत प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून देशमुख महिला मंडळ पेशवाई ग्रुपची पहिली मासिक सभा हॉटेल सेंटर प्लाझा येथे उत्साहात झाली.

कार्यक्रमाला देशमूख महिला मंडळाच्या अध्यक्ष राजश्रीताई, उपाध्यक्ष नयनाताई, सचिव स्वप्नाली ताई, जेष्ठ सल्लागार कविताताई, प्रमुख पाहुण्या म्हणून लाभलेल्या वैशाली संदीप तसेच पेशवाई ग्रुपच्या ग्रुप लीडर विद्या उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्वलन व प्रतिमा पुजन करून करण्यात आली. प्रमुख पाहूण्यांनी मंडळाचे सदस्य बनल्या नंतर महिलांच्या सुप्त गुणांना वाव मिळून त्यांच्यातला आत्मविश्वास वाढतो असे प्रतिपादन केले तर मंडळाच्या अध्यक्षांनी आगामी उपक्रमांबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमाचे बहारदार संचालन अपेक्षा आणि ग्रीष्मा यांनी केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा परिचय मीनाताई यांनी करून दिला. संगीताताई यांनी उपक्रमाची माहिती दिली. गरजू लोकांसाठी नेहमीच देशमुख महिला मंडळ सामाजिक उपक्रम राबवित असत, नवीन वर्ष २०२६ ची सुरवात पण अशाच सामाजिक जाणिवेतून करण्यात आली. रुग्णसेवेकरीता निःस्वार्थ काम करणारे निशिकांत बडगे गाडगेबाबा संस्थान अकोला चालवतात. त्यात ते जे लोक काही साहित्य खरेदी करू शकत नाहीत अशा पेशंटला आवश्यक साहित्य जितके दिवस लागेल तितके दिवस निःशुल्क वापरायला देतात. मग त्यात सर्जिकल बेड असो किंवा वॉकर, व्हीलचेअर वा अजून बरच काही. यात खारीचा वाटा म्हणून पेशवाई ग्रुप कडून एक व्हीलचेअर देण्यात आली. प्रजासत्ताक दिनाची संकल्पना केंद्रस्थानी ठेऊन आयोजित सभेत पेशवाई ग्रुपच्या सदस्यांनी देशभक्ती पर बहारदार नृत्य सादर केले. त्यात मिना, विद्या, सपना, उज्वला, अपेक्षा प्रांजली, संगीता, सारिका, ग्रीष्मा, विद्या यांनी सहभाग घेतला. मंडळाच्या सदस्यांना ड्रेस कोडं देण्यात आला होता. त्यात स्वप्नाली, पूजा, सुजाता, रोहिणी, पूजा, कविता, लता, किरण, साधना, मृदुलता ह्या विजयी ठरल्या. हौजी गेम मध्ये अंजली, कल्पना, रेवती, किरण, वैशाली, सुचिता, सुशीला, संध्या, साधना, प्रमिला, अलका, शुभांगी, शीतल, संध्या, नयना, उज्वला, सोनाली या सर्व सदस्य विजयी ठरल्या. देशभक्तीपर चिठ्ठी गेम मध्ये सारिका, ममता, प्रमिला, तृप्ती, सुजाता, मंजू, सिमा, केतकी, अनुजा या विजयी ठरल्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अनिताताई यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पेशंवाई ग्रुपच्या विद्या, उज्वला, सारिका, अपेक्षा, मीनाताई, संगीताताई, प्रगती, प्रांजली, सपनाताई, अर्चना ताई, अनिताताई, अनुराधाताई, ग्रीष्मा, रेखाताई, विद्याताई, सविताताई यांनी अथक परिश्रम घेतले.

# नाईक होमिओपॅथी येथे अनेक असाध्य आजारावर उपचार केले जातात

**♦ ॲडव्हान्स होमिओपॅथी उपचार रुग्णांसाठी गुणकारी**

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**अकोला :** येथील नाईक होमिओपॅथी मध्ये थॉयरॉईड, लठ्ठपणा, ॲसीडीटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधीवात, मायग्रेन, पिसीओडी सारख्या असाध्य आजारावर उपचार करून रूग्णांना पुन्हा जीवन प्रवाहात आणण्याचे कौशल्य आहे. ॲडव्हॉन्स होमिओपॅथीच्या उपचाराने आजमितीस हजारो रूग्णांनी त्याचा लाभ घेतलेला आहे.




गेल्या ४० वर्षापासून नाईक होमिओपॅथी येथे शरीराच्या सर्व आजारावर सर्वांगीण यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रूग्णांना कुठेही फायदा झाला नाही. अश्या रूग्णांनी एकदा अवश्य भेट द्यावी अधिक माहिती मोबाईल क्र. ९१७५९५७१२९, ९१३००१६१२९ व Naikhomoeopathy.com (Youtube) वर माहिती घ्यावी. रुग्णांनी अनुभव कथन केले.

माझे नांव कांचन नाईक होमिओपॅथी येथे येण्या अगोदर मला थायरॉईड होता. त्यामुळे माझे वजन वाढले होते. हाताला मुंग्या यायच्या, पाळी नियमित नसायची. नाईक होमिओपॅथी मध्ये २ महिन्याच्या उपचारानंतर माझे ५ किलो वजन कमी झाले. या होमिओपॅथी उपचाराने मी पुर्णपणे समाधानी असून मला ६० टक्के फायदा झला आहे.

# हुसैनी सोशल मेमोरियलतर्फे सामूहिक विवाह सोहळा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**अकोला :** आजच्या काळात जिथे लग्ने म्हणजे दिखावा, उधळपट्टी आणि विनाकारण विधींचे समीकरण बनले आहे, तिथे अकोला शहरातील एक संस्था गेल्या २१ वर्षांपासून निकाह अत्यंत सोप्या, साध्या आणि शरीयतच्या तत्त्वांनुसार पार पाडत आहे. हुसैनी सोशल मेमोरियल वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष हाजी सज्जाद हुसेन यांच्या मार्गदर्शनाखाली अकोल्यात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 'इज्तेमाई सामूहिक विवाह सोहळ्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या प्रसंगी २५ जोडपी विवाहबद्ध झाली. वैशिष्ट्य म्हणजे या संपूर्ण कार्यक्रमात कोणत्याही गैर प्रथांना थारा न देता, संपूर्ण आयोजन साधेपणा, इस्लामी तत्त्वे आणि मर्यादेत राहून झाले. यावेळी हाजी सज्जाद हुसेन म्हणाले की, 'आमचा उद्देश उधळपट्टी टाळून निकाहसारखा पवित्र विधी सोपा करणे हा आहे. लग्नाच्या नावाखाली होणारा दिखावा आणि अनावश्यक खर्च समाजातून दूर व्हावा, जेणेकरून तोच पैसा पालकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणावर खर्च करावा, हीच आमची मोहीम आहे.' त्यांनी सर्व नवविवाहित जोडप्यांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे अभिनंदन करताना सांगितले की, साध्या पद्धतीने विवाह करून ते समाजासमोर एक सकारात्मक आदर्श ठेवत आहेत.



हुसैनी सोशल मेमोरियल वेल्फेअर सोसायटी गेल्या २१ वर्षांपासून सातत्याने सामूहिक विवाहाचे आयोजन करत आहे. आतापर्यंत सुमारे ७६० पेक्षा जास्त जोडप्यांचा निकाह या संस्थेच्या माध्यमातून पार पडला आहे. हे केवळ एक आयोजन नसून समाजासाठी एक मोठी 'शांत क्रांती' आहे. या भव्य कार्यक्रमात अकोला शहरातील नवनिर्वाचित नगरसेवक, समाजसेवक, पत्रकार आणि विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी या कार्याचे भरभरून कौतुक केले.



महामहिम माजी राज्यपाल राज्यपाल तथा उतराखंडचे माजी मुख्यमंत्री भगतसिंग कोशारी यांना को पदमाभूषण मिळाल्याबद्दल त्यांचे आमदार रवि राणा व माजी खासदार नवनीत राणा यांनी देहरादून तिथे जाऊन त्यांचा शॉलव पुष्पगुछ देऊन सन्मान केला.

# अकोल्यात अवैध सावकारांवर कारवाई

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**अकोला :** जिल्ह्यातील अवैध सावकारीचे जाळे उघड झाले असून कृषी उत्पन्न बाजार समितीत ट्रेडिंग कंपनीच्या आड सावकारी करणाऱ्या बाफना काका-पुतण्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहा महिन्यांपूर्वी सहकार विभागाने छापा मारल्यानंतर झालेल्या चौकशीत दिलीप सुवालाल बाफना व चेतन सुभाषचंद्र बाफना यांच्याविरुद्ध महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत सिव्हिल लाईन्स पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच दोघेही पसार झाले असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

पातूर येथे कार्यरत सहकार अधिकारी तथा सहाय्यक निबंधक दीपक शिरसाट यांच्या तक्रारीनंतर उपनिबंधक तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांनी कलम १६ अंतर्गत चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार २९ नोव्हेंबर २०२४ रोजी विशेष पथकाने एकाचवेळी तीन ठिकाणी कारवाई केली. विवेकानंद आश्रमाजवळील सुधीर कॉलनीतील दिलीप बाफना यांचे घर, भारत विद्यालयाजवळील सिध्द निवास येथील चेतन बाफना यांचे निवासस्थान तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीतील बाफणा ट्रेडिंग कंपनीच्च्या दुकान क्रमांक पाच येथे झाडाझडती घेण्यात आली. सूत्रांच्या माहितीनुसार बाफना कुटुंबीयांची पातूर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अवैध सावकारी सुरू होती. गरिब व गरजू नागरिकांना जाळ्यात ओढून त्यांची मालमत्ता, दागिने व मौल्यवान वस्तू सावकारीच्या नावाखाली बळकावण्यात आल्याचे गंभीर आरोप आहेत. त्यांना तातडीने अटक करून संपूर्ण नेटवर्कची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. अवैध सावकारी प्रकरणात खदान पोलीस ठाण्यात व्हीएचबी कॉलनी येथील राजरतन सोनू, गड्डम प्लॉट मधील उमेश पातोंड, कच्ची खोली सिंधी कॅप येथील मनोहर कृपलानी, दिनेश कृपलानी आणि संदेश नगरातील संतोष अहिर या पाच जणांविरुद्ध महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कागदपत्रे, नोंदी व अन्य महत्त्वाचे दस्तऐवज जप्त करण्यात आले होते.

# शेतकऱ्यांना भावांतर योजना लागू करा

**♦ भारत कृषक समाजाची मागणी**

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**अकोला :** स्वतंत्र भारताचे पहिले केंद्रीय कृषिमंत्री व भारत कृषक समाजाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख यांनी स्थापन केलेल्या भारत कृषक समाजाची राज्य कार्यकारिणीची सभा संस्थेच्या कार्यालयात नुकतीच पार पडली. तेव्हा सुरुवातीला भाऊसाहेबांच्या प्रतिमेस हार अर्पण झाल्यावर आत्महत्या केलेले शेतकरी व राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

त्यानंतर शेतकरी हिताचे काही ठराव पारित केले. त्यामध्ये प्रामुख्याने भावांतर योजना लागू करणे व भ्रष्टाचाराने युक्त कर्मचारी, अधिकारी, व्यापारी यांच्या फायद्याची व शेतकऱ्यांना त्रासदायक अशी शासकीय खरेदी योजना बंद करून सर्व शेतकऱ्यांना भावांतर योजनेचा लाभ द्यावा तसेच शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवण्यापेक्षा उत्पन्न वाढवून शेतकऱ्यांना आर्थिक मजबूत करावे असे विविध ठराव पारित केले . अकोला, कोल्हापूर, वर्धा, बुलढाणा, जळगाव येथील डॉ. प्रकाश मानकर, रवींद्र पाटील, प्रशांत चौधरी, वसंतराव महाजन, जगतराव पाटील, सुभाष पाटील, प्रशांत वानखेडे, सौ. सीमा पाटील, सौ. सायली पाटील, शैलेश पाटील, रवी पाटील, माधव भारसाकळे, शिवा बेलपत्रे इत्यादी सदस्य उपस्थित होते.



# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या पुढाकाराने शेतकऱ्यांचे उपोषण मागे

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**खामगाव :** तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर बायर कंपनीच्या निकृष्ट मका प्लॅाट बियाण्याविरोधात पोरज येथील शेतकऱ्यांचे सुरू असलेले उपोषण तिसऱ्या दिवशी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी आक्रमक भूमिका घेतल्याने मागे घेतले.

शेतकऱ्यांच्या फसवणूक प्रकरणी तालुका कृषी अधिकारी यांना कंपनी वरती फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याचा आदेश देताच बायर कंपनीने शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करत भरपाई देण्याचे मान्य केले. शिवसेनेचे ॲड.अमोल अंधारे, शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र बघे, पुढाकाराने यशस्वीरीत्या मध्यस्थीमुळे संबंधित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा निघाला झालेल्या नुकसानी भरपाई देण्याचे मान्य केले. व शेतकऱ्यांनी उपोषण मागे घेतले. यावेळी तालुका कृषी अधिकारी पवार व तसेच कंपनी प्रतिनिधी शेतकरी संदीप हेरोडे, देवेंद्र इंगळे, विजय बोराडे, प्रदीप हेरोडे, निलेश वाकोडे, कडूबा शेगोकार, श्याम सकळकळे, अभय बोराडे, चतरसिंग बोराडे, शरद बोराडे, संजय सकळकळे आदी शेतकरी उपस्थित होते.



# पोलिसाच्या प्रसंगावधानामुळे प्राध्यापकाचा वाचला जीव

**प्रदीप धोडकर यांनी धावत जाऊन त्यांना वाचवले**




प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**अमरावती:** जबलपूर एक्सप्रेस अमरावती रेल्वे स्टेशनवर ४ फेब्रुवारी रोजी अमरावतीच्या नवाथे प्लॉट परिसरातील प्रा. दत्तात्रय माधवराव रत्नपारखे हे ५० वर्षीय गृहस्थ वर्ध्याला जाणार होते. एव्हाना गाडी सुरू झाली. चालत्या गाडीत चढण्याचा प्रयत्न जीवावर बेतला असता परंतु तिथे उपस्थित पोलिस हवालदार प्रदीप धोडकर यांनी त्यांना हात दिला. त्यामुळे त्यांचे प्राण वाचले.

जबलपूर एक्सप्रेस प्लॅटफॉर्मवरून निघत असताना प्रा. रत्नपारखे घाईगडबडीमध्ये धावती ट्रेन पकडण्याचा प्रयत्न करत होते. त्यावेळी तेथे कर्तव्यावर असलेले पोलिस हवालदार प्रदीप धोडकर यांनी त्यांना धावत्या ट्रेनमध्ये न बसण्याच्या सूचना दिल्या. परंतु त्यांनी वर्धा येथे जाणे जरूरी असल्याचे सांगून धावत्या ट्रेनमध्ये बसण्याकरीता कोचमध्ये चढत असताना त्यांचा तोल जावून ते खाली पडत असताना प्रदीप घोडकर यांनी प्रसंगावधान दाखवित स्वतःच्या जिवाची पर्वा न करता दत्तात्रय रत्नपारखे यांना पकडून प्लॅटफॉर्मवर ओढून घेतल्याने त्यांचा जीव वाचला. प्रवाशाने त्यांचे आभार व्यक्त करून नंतर बसने वर्धा येथे गेले.

# महाशिवरात्रीनिमित्त सालबर्डीसाठी अतिरिक्त एसटी बस सेवा

प्रतिनिधी ५ फेब्रुवारी

**अमरावती :** महाशिवरात्रीनिमित्त श्री क्षेत्र सालबर्डी तसेच श्री. क्षेत्र कोंडेश्वर येथे भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन एसटी महामंडळाने विशेष तयारी केली आहे. भाविकांना प्रवासाची सोय व्हावी यासाठी जिल्ह्यातील आठ आगारांतून सुमारे १२० यात्रा स्पेशल एसटी बसफेऱ्या सोडण्यात येणार आहेत. सालबर्डी येथील श्री. शंभू महादेव यात्रेसाठी ९ ते १९ फेब्रुवारीदरम्यान या बसफेऱ्या चालवण्यात येतील. विदर्भ व मध्य प्रदेशातून हजारो भाविक या यात्रेसाठी येतात. त्यामुळे भाविकांना अडचण होऊ नये यासाठी अतिरिक्त बस सेवा ठेवण्यात आली आहे. अमरावती विभागातून अमरावती, बडनेरा, धामणगाव रेल्वे, परतवाडा, चांदूर बाजार, दर्यापूर, वरुड, मोर्शी, तिवसा आदी ठिकाणांहून जादा बसफेऱ्या उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सालबर्डी येथे यात्रा केंद्रप्रमुख म्हणून मोर्शी येथील आगारप्रमुख आशा वासनिक, तर अमरावती येथे यात्रा प्रमुख म्हणून आगार व्यवस्थापक पवन देसरमुख यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या सर्व वाहतुकीवर विभागीय वाहतूक अधिकारी संदीप रायलवार यांचे नियंत्रण राहणार आहे. विभाग नियंत्रक नीलेश बेलसरे यांनी भाविकांना आवाहन केले आहे की, महाशिवरात्रीनिमित्त जादा बससेवा उपलब्ध असून अवैध व धोकादायक वाहतुकीऐवजी एसटी बसनेच सुरक्षित प्रवास करावा.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135



CMYK CMYK